cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-४८ | गुरूवार दि.७ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### बदलत्या भारताचा नवा राजकीय नकाशा

भारतीय लोकशाहीच्या विस्तीर्ण पटावर उमटलेले अलीकडील निवडणूक निकाल हे केवळ सत्तांतराचे साधे चित्र नसून, ते देशाच्या बदलत्या राजकीय प्रवाहाचे ठळक प्रतिबिंब आहेत. या निकालांनी मतदारांच्या मनातील अपेक्षा, असंतोष आणि नव्या पर्यायांच्या शोधाची तीव्रता स्पष्ट केली आहे. पाच राज्यांतील या निर्णायक लढतीने भारतीय राजकारणाला नव्या टप्प्यावर आणून ठेवले आहे.

# राज्यातील प्रत्येक टोल नाक्यावर आता कृषी मॉल !

## सार्वजनिक बांधकाम विभागाचा मोठा निर्णय; शेतकऱ्यांना होणार फायदा

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक आणि महत्त्वपूर्ण असा निर्णय समोर आला असून, शेतमाल विक्रीसाठी आता नव्या संधी निर्माण होणार आहेत. राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने पुढाकार घेत राज्यातील प्रत्येक टोल नाक्यावर 'कृषी मॉल' उभारण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी थेट विक्रीचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.**




या कृषी मॉलच्या माध्यमातून शेतकरी आपला ताजा शेतमाल थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवू शकतील. सध्या शेतकऱ्यांना आपला माल विकण्यासाठी दूरवरच्या बाजारपेठांमध्ये जावे लागते, ज्यामुळे वेळ, वाहतूक खर्च आणि श्रम यांचा मोठा बोजा पडतो. मात्र, टोल नाक्यांवरच विक्रीची सुविधा उपलब्ध झाल्यास हा अतिरिक्त खर्च आणि त्रास मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. यासोबतच, ग्राहकांनाही या उपक्रमाचा मोठा फायदा होणार आहे. प्रवासादरम्यान टोल नाक्यांवर थांबताना ताजी भाजीपाला, फळे आणि इतर शेतमाल सहज उपलब्ध होणार आहे. बाजारपेठेपेक्षा कमी दरात आणि अधिक ताज्या स्वरूपात माल मिळणार असल्याने ग्राहकांचीही पसंती या कृषी मॉलकडे वाढण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, शेताच्या जवळच विक्री केंद्र उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ वाचणार असून त्यांना अधिक नफा मिळण्याची संधी निर्माण होईल. मध्यस्थांची भूमिका कमी होऊन थेट विक्रीला चालना मिळणार आहे, जे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीसाठी सकारात्मक पाऊल मानले जात आहे. यापूर्वी राज्यात शहरांमध्ये आठवडी बाजार सुरू करून शेतकऱ्यांना नवीन बाजारपेठ पान २ वर

# अमेरिका-इराण युद्ध समाप्तीकडे ; पुढील ४८ तास निर्णायक

**न्यूयॉर्क । वृत्तसंस्था**

**अमेरिका आणि इराण हे युद्ध समाप्तीच्या समीप आले असून 'एक्सिओस'ने अमेरिकन अधिकारी आणि संबंधित सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेने इराणसोबतचे युद्ध संपवण्यासाठी आणि व्यापक अणू चर्चेसाठी एका पानाचा सामंजस्य करार करण्याच्या अंतिम टप्प्यात आहे.**



रिपोर्टनुसार, प्रस्तावित आराखड्यात १४ मुद्द्यांचा समावेश असलेला एक पानाचा एमओयू तयार करण्यात आला आहे. याचा मुख्य उद्देश तात्काळ युद्धबंदी लागू करणे आणि पुढील ३० दिवसांत पूर्ण कराराला अंतिम स्वरुप देणे असा आहे. या अंतर्गत इराण आपल्या युरेनियम संवर्धन कार्यक्रमाला अल्पकाळासाठी स्थगिती देण्यास तयार झाला आहे. त्या बदल्यात, अमेरिका इराणवरील निर्बंध हटवण्याची आणि इराणची अब्जावधी डॉलर्सची गोठवलेली मालमत्ता मुक्त करण्याची प्रक्रिया सुरू करेल. दोन्ही देश 'होर्मुज सामुद्रधुनी'मधील तणाव कमी करण्यासाठी आणि सागरी जलमार्गातील अडथळे दूर करण्यासाठी एकमेकांना सहकार्य करतील. अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की, अनेक महत्त्वाच्या अटी पुढील चर्चेवर अवलंबून आहेत. त्यामुळे पुन्हा संघर्ष किंवा प्रदीर्घ अनिश्चिततेचा धोका कायम आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुज सामुद्रधुनीतील लष्करी हालचाली कमी करण्याचा घेतलेला अलीकडील पान २ वर

## गोकुळच्या निवडणुका ९० दिवसात घ्या ; सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश


**दिल्ली । वृत्तसंस्था**



राज्याचं लक्ष लागलेल्या कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघ निवडणूक प्रकरणात नवा ट्विस्ट आल्याचं दिसून येतंय. गोकुळची निवडणूक ९० दिवसात घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. राज्य सरकारने प्रशासक नेमल्यानंतर दोनच दिवसात मोठी उलथापालथ झाल्याचं दिसून येतंय. या आधी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने बाराशे संस्थांच्या चौकशीनंतर निवडणूक घेण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर आता सर्वोच्च न्यायालयानेही निवडणूक प्रक्रिया ९० दिवसात संपवण्याचे आदेश दिले आहेत. गोकुळ दूध संस्थेवर दोनच दिवसांपूर्वी प्रशासकाची नेमणूक झाली होती. याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने पान २ वर

# सुनेत्रा पवार यांचा खासदारकीचा राजीनामा; उपराष्ट्रपतींकडे पत्र सादर

**दिल्ली । वृत्तसंस्था**



राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी आपल्या राज्यसभा खासदारकीचा राजीनामा दिला आहे. उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेत त्यांनी आपले राजीनामा पत्र सादर केले. उपमुख्यमंत्रीपदावर विराजमान झाल्यापासून त्यांच्या खासदारकीच्या राजीनाम्याची चर्चा होती. मात्र, बारामती विधानसभा निवडणुकीत विक्रमी मतांनी विजयी होऊन आमदार झाल्यानंतरच त्यांनी बुधवारी आपल्या खासदारकीचा राजीनामा दिला आहे. दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनानंतर अनपेक्षितपणे राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सुनेत्रा पवार यांच्याकडे आली आहे.

सुनेत्रा पवार या बारामती विधानसभा निवडणुकीत निवडून आल्या असल्याने त्यांनी आपला राज्यसभा खासदारकीचा राजीनामा दिला आहे. नियमानुसार दोन्ही सभागृहात निवडून आलेल्या व्यक्तीला एका सभागृहाचा राजीनामा १४ दिवसांच्या आत देणं बंधनकारक असते. त्यामुळेच, आमदारकीच्या निवडणुकीचा पान २ वर

# राजीनामा दिला नाही तर ममता बॅनर्जींना अटक होणार ?

**कोलकाता । वृत्तसंस्था**

**पश्चिम बंगालच्या राजकारणात अभूतपूर्व घडामोडी घडताना दिसत आहे. विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतरही मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राजीनामा देण्यास नकार दिल्याने मोठा घटनात्मक पेच निर्माण झाला आहे. या निर्णयामुळे राजकीय वातावरण तापले असून कायद्याच्या दृष्टीनेही अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.**



ताज्या घडामोडीनुसार, निवडणुकीत बहुमत गमावूनही ममता बॅनर्जी यांनी राजीनामा देणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांनी आपण लढलो आणि जिंकलो असा दावा केला असला, तरी निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार वेगळे चित्र दिसत आहे. या भूमिकेमुळे लोकशाही पद्धती आणि प्रस्थापित परंपरांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. राजीनामा न दिल्यास मुख्यमंत्र्यांना अटक होऊ शकते का? पान २ वर

## वंदे मातरम'ला राष्ट्रगीतासमान दर्जा; अपमानास शिक्षा, केंद्राचा निर्णय

**दिल्ली । वृत्तसंस्था**

केंद्र सरकारने 'वंदे मातरम'ला राष्ट्रगीत जन गण मन प्रमाणेच दर्जा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत यास मंजुरी देण्यात आली. तसेच 'राष्ट्रीय गौरव अपमान निवारण अधिनियम'मध्ये आवश्यक सुधारणा करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

सरकारच्या निर्णयानुसार, वंदे मातरम या गीतासाठी आता राष्ट्रगीतासारखेच नियम व निर्बंध लागू असतील. यामुळे 'वंदे मातरम'चा अपमान केल्यास किंवा त्याच्या गायनात अडथळा आणल्यास संबंधित व्यक्तीविरुद्ध फौजदारी कारवाई होणार आहे. सध्या राष्ट्रीय ध्वज, संविधान आणि राष्ट्रगीताचा अपमान केल्यास शिक्षा होते; त्यात पान २ वर

## नेवासा येथून अल्पवयीन पीडितेची सुटका बीड एएचटीयू पथकाची यशस्वी कामगिरी

**बीड । प्रतिनिधी**

चकलांबा पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या अपहरणाच्या गुन्ह्यातील एका अल्पवयीन पीडितेची सुटका करण्यात बीडच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला यश आले आहे. याप्रकरणी एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील कारेगाव येथून ही कारवाई करण्यात आली.

चकलांबा पोलीस ठाण्यात कलम ३६३ (भादंवि) नुसार गुन्हा रजिस्टर नंबर १६१/२०२४ दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे वर्ग करण्यात आल्यानंतर, पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव यांनी गुन्ह्याची फाईल पान २ वर



# जरांगे पाटलाचा नकार कडू साठी ठरला गोड

**बीड । सुभाष चौरे**

**विधान परिषदेच्या जागांसाठी निवडून द्यायच्या काळामध्ये महायुतीकडून बिनविरोध निवडून येणाऱ्यांची खात्री असल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून मराठा संघर्ष येथे मनोज जरांगे पाटील यांचे नाव होते त्यासाठी एकनाथ शिंदे यांचे विश्वासू मंत्री उदय सामंत मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीला आले होते मात्र त्यांनी नकार दिल्यामुळे प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांचे नाव पुढे आले आणि जारांगे पाटलांच्या नकारानंतरच माजी मंत्री बच्चू कडू त्यांच्यासाठी गोड बातमी पुढे आल व नाव फायनल झाले.**





विधान परिषदेच्या आठ जागांसाठी नुकतीच निवडणूक बिनविरोध पार पडली महायुतीकडे सात आणि महाविकास आघाडीकडे एक अशा आठ जागांसाठी ही निवडणूक होणार होती महायुतीतून म्हणजेच भाजपाचे पाच शिवसेना एकनाथ शिंदे व राष्ट्रवादी अजितदादा पवार यांचा प्रत्येकी एक सदस्य विधान परिषदेवर जाणार होतो महाविकास आघाडीकडे एकमेव एक जागा होती विशेषता भाजपाकडे पाच जागा असल्याने भाजपाने आपले उमेदवार केंद्रीय पातळीवरून जाहीर केले राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्याकडून ईशान यांचे नाव जाहीर झाले शिवसेना एकनाथ शिंदे यांच्या गटाकडून नाव निश्चित करण्यापूर्वी मोठी खलबते घडली ती आता हळूहळू बाहेर येत आहेत विशेषता एकनाथ शिंदे यांच्याकडून मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांना विधान परिषदेवर घेण्याच्या हालचाली सुरू होत्या या संदर्भात त्यांची प्राथमिक बोलणी ही झाली होती मात्र याला पाटील यांनी सहमती दर्शवली नव्हती तरीही शेवटच्या क्षणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष दूत म्हणून मंत्री उदय सामंत यांना थेट अंतरवली सराटी मध्ये पाठवण्यात आले होते कोणतेही निमित्त कोणत्याही कारण नसताना सामंत जरांगे पाटील यांच्या भेटीला आले ते कोणत्या कारणामुळे आहे याची बातमी आली नाही मात्र या मागची खरी बातमी ही आहे की पाटील यांना विधान परिषदेवर घेण्यासाठी निरोप होता परंतु पाटील यांनी समर्थता दर्शवली नाही आणि निरोप घेऊन उदय सामंत मुंबईला पोहोचले त्यानंतर प्रहार संघटनेचे अध्यक्ष माजी आमदार बच्चू कडू यांचे काही अटीवर नाव फायनल करण्यात आले ते म्हणजे पूर्ण प्रहार संघटना शिवसेनेमध्ये विलीन करून उमेदवारी दिली , जरांगे पाटील यांनी नकार दिल्यामुळे माजी मंत्री बच्चू कडू यांचे गोड दिवस आले असे म्हटले पान २ वर




## थोडक्यात...

### साई रिसॉर्टप्रकरणात अनिल परब यांची निर्दोष मुक्तता

मुंबई : शिवसेना ठाकरे गटाचे नेते तथा आमदार अनिल परब यांच्यावर भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी गंभीर आरोप केले होते. दापोलीतील साई रिसॉर्ट प्रकरणात जमीन हडप केल्या आणि शासनाच्या सीआरझेडच्या नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला होता. मात्र, आता खेड येथील अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायालयाने दापोलीतील साई रिसॉर्ट प्रकरणात मोठा निर्णय देत शिवसेना ठाकरे पक्षाचे नेते अनिल परब यांच्यासह सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. त्यामुळे, अनिल परब यांना दिलासा मिळाला असून किरीट सोमय्या यांनी या निकालानंतर प्रतिक्रिया दिलीय. रत्नागिरी जिल्ह्याच्या दापोली तालुक्यातील मुरुड येथे असलेल्या साई रिसॉर्टशी संबंधित प्रकरणात आरोपींवर सीआरझेड नियमांचे उल्लंघन करून बांधकाम केल्याचा, तसेच खोटी कागदपत्रे सादर केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. मात्र, सुनावणीदरम्यान न्यायालयाने जमीन आणि बांधकाम हे स्वतंत्र घटक असल्याचे निरीक्षण नोंदवत पुराव्यांच्या आधारे सर्व आरोप सिद्ध होत नाहीत, असा निष्कर्ष काढला. त्यामुळे सर्व आरोपींना निर्दोष ठरवत न्यायालयाने त्यांची मुक्तता केली.

### देशातील पहिले ट्रायबल इंडस्ट्रीयल क्लस्टर दिंडोरी तालुक्यात

दिंडोरी: देशातील पहिले ट्रायबल इंडस्ट्रीयल क्लस्टर दिंडोरी तालुक्यातील जांबुटके येथे आकारास येणार आहे. त्यासाठी आवश्यक जमिनीचे हस्तांतरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (एमआयडीसी) करण्यात आले. यावेळी विविध सामंजस्य करारांचे आदान- प्रदान करण्यात आले. कुंभ उद्योग संगम आणि नाशिक डिस्ट्रिक्ट इन्व्हेसमेन्ट समीट आज हॉटेल ताज गेट वे येथे पार पडले. त्यात या जमिनीचे हस्तांतरण करण्यात आले. गुंतवणूक परिषदेत करण्यात आलेल्या ३०० हून अधिक सामंजस्य कराराच्या माध्यमातून १३ हजार १९० कोटींची गुंतवणूक होणार आहे. यावेळी कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, उद्योग मंत्री उदय सामंत, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न, औषध प्रशासन व विशेष साहाय मंत्री नरहरी झिरवाळ, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह आदी उपस्थित होते.

### पंचवटीतील श्री काळाराम मंदिरावर फडकला धर्मध्वज

नाशिक: आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७-२८ च्या पार्श्वभूमीवर पंचवटीतील ऐतिहासिक श्री काळाराम मंदिरात आज धर्मध्वज उभारणी सोहळा पार पडला. अयोध्येच्या धर्तीवर उभारलेल्या २१ फूट उंच पंचधातूच्या धर्मध्वज स्तंभावर भगवा धर्मध्वज विधिवत पूजन करून माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते फडकविण्यात आला. यावेळी कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, महापौर हिमगौरी आडके-आहेर, अयोध्या न्यासाचे कोशाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज, महंत सुधीरदास पुजारी उपस्थित होते. पंचधातूपासून तयार केलेल्या धर्मध्वजस्तंभावर ११ बाय ५ फूट आकाराचा भगवा ध्वज आहे. त्याच्यावर हनुमंतरायांची प्रतिमा तसेच सूर्यदेवतेचे 'ॐ' चिन्ह अंकित करण्यात आले आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०६ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २२१.५० क्विंटल | २,१२५ | २,६०० | २,३१५ |
| ज्वारी/हायब्रिड: १४९.०० क्विंटल | १,८०१ | ३,८५१ | २,३०० |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ५.०० क्विंटल | ६,००० | ६,५०१ | ६,२५० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: १२६.५० क्विंटल | १,८३२ | २,५६२ | २,२४१ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |

cmyk

## अग्रलेख

# बदलत्या भारताचा नवा राजकीय नकाशा

भारतीय लोकशाहीच्या विस्तीर्ण पटावर उमटलेले अलीकडील निवडणूक निकाल हे केवळ सत्तांतराचे साधे चित्र नसून, ते देशाच्या बदलत्या राजकीय प्रवाहाचे ठळक प्रतिबिंब आहेत. या निकालांनी मतदारांच्या मनातील अपेक्षा, असंतोष आणि नव्या पर्यायांच्या शोधाची तीव्रता स्पष्ट केली आहे. पाच राज्यांतील या निर्णायक लढतीने भारतीय राजकारणाला नव्या टप्प्यावर आणून ठेवले आहे.

पश्चिम बंगालमध्ये झालेला सत्तांतराचा बदल हा या निवडणुकीतील सर्वात मोठा आणि धक्कादायक परिणाम ठरतो. दीर्घकाळ टिकलेल्या सत्तेला मतदारांनी नाकारत नवा पर्याय स्वीकारला, ही घटना केवळ एका राज्यापुरती मर्यादित नसून राष्ट्रीय राजकारणावरही दूरगामी परिणाम करणारी आहे. या निकालाने संघटनशक्ती, नियोजन आणि स्थानिक पातळीवरील कार्यक्षमतेचे महत्त्व अधोरेखित केले आहे. व्यक्तिमत्त्वाच्या करिष्म्यापेक्षा संघटनात्मक बळ अधिक प्रभावी ठरते, हे पुन्हा सिद्ध झाले आहे.

या विजयाचे पडसाद केवळ राज्यापुरते मर्यादित राहणार नाहीत. केंद्र आणि राज्य यांच्यातील समन्वय वाढण्याची शक्यता निर्माण झाली असून, धोरणात्मक निर्णय आणि विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा आहे. दीर्घकाळ प्रलंबित राहिलेल्या योजनांच्या अंमलबजावणीत येणारे अडथळे दूर होऊन विकासाच्या प्रक्रियेला नवे बळ मिळू शकते. मतदारांनी दिलेला हा कौल म्हणजे केवळ राजकीय बदल नव्हे, तर कार्यक्षम प्रशासनाची मागणी आहे.

दक्षिण भारतात मात्र वेगळे चित्र पाहायला मिळते. येथे मतदारांनी प्रस्थापित पक्षांना धक्का देत नव्या नेतृत्वाला संधी दिली आहे. यामुळे प्रादेशिक राजकारणात नव्या समीकरणांची निर्मिती होत असून, पारंपरिक घराणेशाहीला आव्हान उभे राहत आहे. हा बदल युवा नेतृत्वाच्या उदयाचा आणि मतदारांच्या नव्या विचारसरणीचा संकेत मानला जाऊ शकतो.

दरम्यान, डाव्या विचारसरणीच्या राजकीय अस्तित्वावर आलेले संकट हे या निवडणुकीचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अनेक दशकांपासून भारतीय राजकारणात प्रभाव टाकणाऱ्या या विचारप्रवाहाला आता आत्मपरीक्षणाची गरज भासू लागली आहे. बदलत्या सामाजिक आणि आर्थिक वास्तवाशी जुळवून घेण्यात झालेल्या अपयशामुळे मतदारांनी त्यांच्याकडून पाठ फिरवली आहे, हे स्पष्ट दिसते.

काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षांसाठीही हे निकाल चिंतनाचा विषय ठरले आहेत. वाढत्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी नव्या रणनीती, प्रभावी नेतृत्व आणि जनतेशी अधिक घट्ट नाते निर्माण करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. अन्यथा, राजकीय पटलावर त्यांचे स्थान अधिकच कमकुवत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एकूणच, हे निवडणूक निकाल भारतातील मतदार अधिक जागरूक, अपेक्षाभिमुख आणि परिणामकेंद्रित झाल्याचे दर्शवतात. आता केवळ आश्वासनांवर नव्हे, तर ठोस कामगिरीवर मतदारांचा विश्वास टिकतो. बदलत्या भारतात राजकीय पक्षांना केवळ सत्तेसाठी नव्हे, तर विकासासाठी स्पर्धा करावी लागणार आहे.

या नव्या राजकीय वास्तवात 'डबल इंजिन' सरकारे कितपत प्रभावी ठरतात, विकासाची गती किती वाढते आणि मतदारांच्या अपेक्षांची पूर्तता कशी होते, यावरच भविष्यातील राजकीय समीकरणे अवलंबून राहतील. भारतीय लोकशाहीचा हा नवा अध्याय अधिक जबाबदारी, पारदर्शकता आणि कार्यक्षमतेची मागणी करणारा ठरणार आहे.

## पाटोदा नगर पंचायत सदस्य अपात्रता प्रकरणात ४ आठवड्यांत निकाल द्या; औरंगाबाद खंडपीठाचे आदेश

पाटोदा । प्रतिनिधी

**बीड जिल्हाधिकाऱ्यांकडे गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पाटोदा नगर पंचायत सदस्यांच्या अपात्रता प्रकरणावर अखेर मुंबई उच्च न्यायालय च्या औरंगाबाद खंडपीठाने कठोर भूमिका घेतली आहे. संबंधित प्रकरणातील निकाल पुढील चार आठवड्यांत जाहीर करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.**



शिवभूषण लक्ष्मणराव जाधव आणि शेख मोबीन शेख हमीद यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना हा आदेश देण्यात आला. याचिकाकर्त्यांनी अपात्रता अर्ज क्रमांक १६७/२०२४ आणि १६८/२०२४ वर तातडीने निर्णय देण्याची मागणी केली होती. या प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि अजित बी. कडेठाणकर यांच्या खंडपीठासमोर झाली. सुनावणीदरम्यान शासनाच्या वतीने सादर करण्यात आलेल्या माहितीनुसार, संबंधित अर्जांवरील निर्णय चार आठवड्यांत जाहीर केला जाईल, असे सांगण्यात आले. न्यायालयाने हे विधान हमीपत्र म्हणून स्वीकारत जिल्हाधिकाऱ्यांना निश्चित मुदतीत निर्णय देण्याचे आदेश दिले आणि याचिका निकाली काढली. या प्रकरणात याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. नरसिंह जाधव यांनी बाजू मांडली, तर शासनाच्या वतीने एजीपी नेहा बी. कांबळे यांनी युक्तिवाद केला. दरम्यान, पाटोदा नगर पंचायतचे दोन सदस्यमाजी जिल्हा परिषद अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला आणि माजी नगराध्यक्ष बळी पोटेयांच्या अपात्रतेचे प्रकरण गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित आहे. याचिकाकर्ते यापूर्वीही उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयीन प्रक्रियेनुसार, निर्णय राखीव ठेवल्यानंतर तो लवकर जाहीर करणे अपेक्षित असते, असे सर्वोच्च न्यायालय नेही नमूद केले आहे. मात्र, या प्रकरणात कथित राजकीय दबावामुळे विलंब होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. जिल्हा प्रशासनाकडून अशा महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये विलंब होत असेल, तर सामान्य नागरिकांना न्याय कितपत मिळेल, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

# तरुणीवर अत्याचार करून धर्मांतरासाठी दबाव; मुख्य आरोपीसह दोघे अटकेत




**कुटुंबातील एकूण चार जणांविरुद्ध गुन्हे नोंदवले**

पीडितेच्या तक्रारीनंतर पारध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तत्काळ कारवाई करत शेख इम्रान शेख हबीब याच्यासह त्याच्या कुटुंबातील एकूण चार जणांविरुद्ध गुन्हे नोंदवले आहेत. यापैकी मुख्य आरोपी शेख इम्रान आणि त्याच्या भावाला अटक करण्यात आली असून, उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. या प्रकरणी पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू यांनी सांगितले की, घटनेची गंभीर दखल घेण्यात आली असून, सर्व बाबींची सखोल चौकशी सुरू आहे.

**घटनेमुळे समाजात संताप व्यक्त पीडितेला न्याय**

मिळवून देण्यासाठी पोलिसांकडून आवश्यक ती सर्व कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या घटनेमुळे समाजात संताप व्यक्त केला जात असून, आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. पारध पोलीस पुढील तपास करत आहेत.

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यात एका तरुणीवर अत्याचार करून धर्मांतरासाठी दबाव आणल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आलाय. यानंतर पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधु येणे पोलीस प्रशासनाला तात्काळ आदेश देऊन गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले तसेच या प्रकरणी एकही आरोपी सुटणार नाही अशी प्रतिक्रिया पोलीस अधीक्षक यांनी दिली. या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी शेख इम्रान शेख हबीब याने तिचे अश्लील फोटो काढून ते व्हायरल करण्याची धमकी दिली आणि त्याच माध्यमातून तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याचा आरोप आहे. तक्रारीत पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, आरोपीने तरुणीवर नमाज पठण करण्यासाठी आणि बुरखा परिधान करण्यासाठी दबाव टाकला. विविध ठिकाणी नेऊन तिचा मानसिक आणि शारीरिक छळ केल्याचेही पीडितेने पोलिसांकडे सांगितले. या प्रकरणात आरोपीने धमकी देत तिचे आयुष्य उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप आहे.

## चक्री जुगार अड्ड्यावर छापा

बीड । प्रतिनिधी

**बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये अवैध चक्री नावाच्या जुगार अड्ड्यावर छापा कारवाई करून त्या ठिकाणी रोख रक्कम व चक्री जुगाराचे साहित्य असा एकूण ३०,६२०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करून पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत चक्री नावाच्या जुगार अड्ड्यावर छापा मारून या प्रकरणांमध्ये ३०६२० रुपयाची रोख रक्कम आणि जुगार साहित्य जप्त करण्यात आले. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरची कारवाई पोलीस उपनिरीक्षक खटावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार पोह/१६२६ राहुल शिंदे , पोह/४०२ आनंद मस्के ,पोह/८३७ गोविंद राख, चापोह/७७९ नितीन वडमारे यांनी केली आहे.

# ६५ कोतवाल व पोलीस पाटील 'आपदा मित्र' प्रशिक्षणासाठी रवाना

जालना । प्रतिनिधी

**नैसर्गिक तसेच मानवनिर्मित आपत्तींच्या काळात गावपातळीवर तात्काळ व प्रभावी प्रतिसाद देण्यासाठी सक्षम मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने जालना जिल्ह्यातील ६५ कोतवाल व पोलीस पाटील यांना "आपदा मित्र" योजनेअंतर्गत विशेष निवासी प्रशिक्षणासाठी रायगड जिल्ह्यातील कोलाड येथे रवाना करण्यात आले आहे. ही योजना राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अंतर्गत राबविण्यात येत आहे.**




जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अध्यक्षा आशिमा मित्तल यांच्या निर्देशानुसार आणि निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा दांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. गावपातळीवरील प्रशासनात कोतवाल व पोलीस पाटील हे अत्यंत महत्त्वाचे घटक असून आपत्तीच्या वेळी नागरिकांपर्यंत सर्वप्रथम पोहोचणारे प्रतिनिधी म्हणून त्यांची भूमिका निर्णायक ठरते. याच पार्श्वभूमीवर त्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे सखोल व प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणामध्ये पूरस्थितीतील बचावकार्य, सर्च अँड रेस्क्यू ऑपरेशन, जल बचाव , दोरीच्या साहाय्याने बचावकार्य , अग्निशमन तंत्र, आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली, प्राथमिक उपचार, सीपीआर, जखमी व्यक्तींची सुरक्षित हाताळणी, स्थलांतर प्रक्रिया , तसेच आपत्तीपूर्व तयारी, आपत्तीतील समन्वय आणि आपत्तीनंतर पुनर्वसन या विषयांचा समावेश आहे. कोलाड येथील राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण केंद्रात तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण होणार असून प्रत्यक्ष आपत्तीजन्य परिस्थितीचे अनुकरण ( व ) करून प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष कार्यानुभव दिला जाणार आहे. त्यामुळे भविष्यात आपत्तीच्या प्रसंगी अधिक वेगाने, शिस्तबद्ध आणि प्रभावी प्रतिसाद देणे शक्य होणार आहे. जिल्ह्यातील आठ तालुक्यांमधून या प्रशिक्षणासाठी सहभाग नोंदविण्यात आला आहे. त्यामध्ये जालना (०८), बदनापूर (०४), भोकरदन (०६), जाफ्राबाद (०६), परतूर (०७), मंठा (०३), अंबड (१९) आणि घनसावंगी (१२) अशा एकूण ६५ प्रशिक्षणार्थींचा समावेश आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर या प्रशिक्षित कोतवाल व पोलीस पाटील यांचा जिल्हा आपत्ती प्रतिसाद यंत्रणेत आवश्यकतेनुसार उपयोग करण्यात येणार असून ग्रामस्तरावर आपत्ती सज्जता निर्माण करण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरणार आहे. हिरवी झेंडी दाखवत त्यांना प्रशिक्षणासाठी रवाना केले.

# जायकासह महाराष्ट्रात वैद्यकीय क्षेत्र बळकट करण्यासाठी नवे पाऊल-मुख्यमंत्री

## • जायकाकडून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्राच्या विकास प्रवासात विविध क्षेत्रांत मोलाचे योगदान देणाऱ्या (जायका) या आंतरराष्ट्रीय संस्थेसोबत आता वैद्यकीय क्षेत्रातही सहकार्याची नवी दिशा निर्माण होणार आहे. राज्यातील वैद्यकीय सेवा अधिक सक्षम आणि आधुनिक करण्यासाठी जायका महाराष्ट्रासोबत भागीदारी करण्यास उत्सुक असून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता घेण्यास मंत्रीमंडळाने मान्यता दिली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की यापूर्वी आसाम आणि तामिळनाडू सारख्या राज्यांमध्ये यशस्वी प्रकल्प राबविल्यानंतर, जायका आता महाराष्ट्रातही 'मेडिकल केअर सिस्टम' मजबूत करण्यासाठी पुढाकार घेत आहे. विशेषतः राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागासोबत समन्वय साधून हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रस्तावित भागीदारीत खालील महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे, सध्याच्या शासकीय वैद्यकीय, पॅरामेडिकल आणि नर्सिंग महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधांचा विकास, आधुनिक निदान (डायग्नोस्टिक) यंत्रणा अधिक सक्षम करणे विशिष्ट आजारांसाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स' उभारणे. नवीन नर्सिंग आणि पॅरामेडिकल महाविद्यालयांची स्थापना करून प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे. आरोग्य व्यवस्थापन प्रणाली अधिक कार्यक्षम करण्यासाठी सहाय्य, राज्य सरकारच्या वतीने या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला असून, वैद्यकीय शिक्षण विभागाने आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याची तयारी दर्शविली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात यापूर्वीच शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत. याशिवाय जळगांव, लातूर, बारामती, मिरज, कोल्हापूर, नंदूरबार व गोंदिया या सात जिल्ह्यांमध्ये १०० प्रवेश क्षमतेचे शासकीय बीएस्सी नर्सिंग विद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय व संलग्नित रूग्णालयांच्या पायाभूत सुविधांकरिता तसेच अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध व्हावी, याकरिता 'स्ट्रेन्थनिंग टर्शरी हेल्थ केअर डिलीव्हरी, मेडिकल एज्युकेशन सिस्टीम ॲण्ड नर्सिंग सिस्टीम इन महाराष्ट्र' हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी जपानच्या इंटरनॅशनल को ऑपरेशन एजन्सीकडून ३ हजार ७०८ कोटींचे वित्तीय सहाय्य उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. त्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या प्रकल्पात वर्धा, पालघर, रत्नागिरी, अहिल्यानगर या नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी तसेच मुंबईतील जीटी, सेंट जॉर्ज, धुळे, सोलापूर, अंबेजोगाई, अकोला, आयजीएमसी नागपूर, रत्नागिरी, पालघर, धाराशिव येथील नर्सिंग महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करण्यात येणार आहे. तर बारामती, सांगली (मिरज), कोल्हापूर येथील नर्सिंग महाविद्यालयांचे बांधकाम करण्यात येणार आहे. याशिवाय अहिल्यानगर, भंडारा, गडचिरोली, हिंगोली, जालना, मुंबई, नाशिक, परभणी, सातारा, पालघर, रत्नागिरी, वर्धा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी यंत्रसामुग्री उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. तसेच भारत-जपान शैक्षणिक आदान प्रदान कार्यक्रमांतर्गत रूग्णालय व्यवस्थापन व प्रशासन मानवसंसाधन विकास यांच्या क्षमता वृध्दीसाठी तरतूद करण्यात येणार आहे. या भागीदारीमुळे महाराष्ट्रातील आरोग्यसेवा अधिक दर्जेदार, सुलभ आणि आधुनिक होईल .त्यामुळे राज्यातील नागरिकांना उत्तम वैद्यकीय सुविधा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे.एकूणच, जायका आणि महाराष्ट्र सरकार यांच्यातील ही प्रस्तावित भागीदारी आरोग्य क्षेत्रातील विकासासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## पान १ वरून...

### राज्यातील प्रत्येक टोल नाक्यावर

उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. त्या उपक्रमानंतर आता टोल नाक्यांवरील कृषी मॉल ही आणखी एक महत्त्वाची पायरी ठरणार आहे. या निर्णयाचे शेतकरी वर्गातून स्वागत करण्यात येत असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासोबतच ग्राहकांना दर्जेदार आणि ताजे अन्नपदार्थ उपलब्ध करून देणारा हा उपक्रम ठरणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. भविष्यात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास राज्यातील कृषी क्षेत्राला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे.

---------------

### गोकुळच्या निवडणुका ९० दिवसात

याबाबत आधी एक निकाल दिला होता. ज्या १२०० संस्थांच्या तक्रारी आल्या होत्या त्यांच्या चौकशीनंतर निवडणू घेण्याचे आदेश सर्किट बेंचने दिले होते. त्यानंतर सत्ताधारी गटातील काही संचालक हे सर्वोच्च न्यायालयात गेले. जर एखादी सहकारी संस्था निवडणूक घेण्यास तयार नसेल तर त्याच्यावर प्रशासन नेमका जातो अशी सहकारी कायद्यामध्ये तरतूद आहे. त्यानुसार गोकुळ दूध संघाचे संचालक निवडणूक घेण्यासाठी तयार असतानाही सर्किट बेंचने जो निर्णय दिला त्याच्या विरोधात काही संचालक सर्वोच्च न्यायालयात गेले. त्यानुसार आता सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. येत्या ९० दिवसात निवडणूक प्रक्रिया पूर्ण कसा असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. ज्या काही १२०० संस्था आहेत त्यापैकी जवळपास ७५० संस्थांची चौकशी पूर्ण झाली आहे. उर्वरित संस्थांची चौकशी चार ते पाच दिवसात करण्यात यावी. तसेच निवडणुकीचा ४५ दिवसांचा कालावधी लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने ही सगळी प्रक्रिया ९० दिवसात संपवण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, गोकुळ दूध संघाच्या कारभारावरुन आता राज्याचे मंत्री हसन मुश्रीफ आणि भाजपचे आमदार शिवाजी पाटील यांच्यामध्ये आरोप प्रत्यारोप होत आहेत. दोघेही महायुतीचे नेते असले तरी एकमेकांवर टीका करण्याची एकही संधी ते सोडताना दिसत नाहीत.

---------------

### अमेरिका-इराण युद्ध समाप्तीकडे

निर्णय याच राजनैतिक प्रयत्नांचा परिणाम आहे. याचे नेतृत्व अमेरिकन दूत स्टीव्ह विटकॉफ आणि जेरेड कुशनर करत आहेत, जे थेट आणि मध्यस्थांच्या माध्यमातून तेहरानच्या संपर्कात आहेत. संबंधित कराराला औपचारिक स्वरूप प्राप्त झाले, तर ती अधिकृतपणे 'युद्ध समाप्तीची' घोषणा असेल आणि पुढील तांत्रिक चर्चा इस्लामाबाद किंवा जिनिव्हा येथे हलवण्यात येतील.

--------------

### राजीनामा दिला नाही तर

कायद्याच्या दृष्टीने पाहिले तर केवळ राजीनामा न देणे हा गुन्हा ठरत नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत थेट अटक करण्याचा कोणताही कायदेशीर आधार नाही. हा विषय फौजदारी कायद्याऐवजी घटनात्मक प्रक्रिया आणि नैतिकतेशी संबंधित आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६४(१) नुसार, जर मुख्यमंत्री बहुमत सिद्ध करू शकत नसतील तर राज्यपालांना त्यांना पदावरून हटवण्याचा अधिकार आहे. अशा परिस्थितीत राज्यपाल मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाला बर्खास्त करून नवीन सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा करू शकतात.ममता बॅनर्जी यांनी राजीनामा न दिल्यास त्यांना अटक होणार नाही, पण राज्यपालांच्या हस्तक्षेपामुळे त्यांना बर्खास्त केले जाऊ शकते. संविधानानुसार कोणताही नेता जनादेशाच्या विरोधात सत्तेत राहू शकत नाही. त्यामुळे अखेरीस घटनात्मक मार्गानेच नवीन सरकार स्थापन होईल. एकूणच, ही परिस्थिती पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठा टर्निंग पॉइंट ठरू शकते.

---------------

### सुनेत्रा पवार यांचा खासदारकीचा

निकाल जाहीर होताच, त्यांची आपला खासदारकीचा राजीनामा दिला. आता, लवकरच सुनेत्रा पवार यांच्या रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेवर पोटनिवडणूक जाहीर होईल. त्यानंतर, येथील राज्यसभेच्या जागेवर कोणाची नियुक्ती होईल, याची उत्सुकता आता राष्ट्रवादीसह इतरही राजकीय नेत्यांना लागली आहे. दरम्यान, सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यापूर्वीच त्यांचे चिरंजीव पार्थ पवार हेही खासदार बनले आहेत. गेल्याच महिन्यात पार्थ पवार यांनी राज्यसभा खासदारकीची शपथ घेतली आहे. नुकतेच झालेल्या बारामती पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना २ लाख १८ हजार ९३० मतं मिळाली, तर त्यांच्याविरोधात असलेल्या २२ उमेदवार आणि 'नोटा' यांना ४८३७ इतकी मते मिळाली. बारामतीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी २०१९ मध्ये केलेला मताधिक्याचा विक्रम उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मोडला आहे, विक्रमी मतांनी सुनेत्रा पवारांचा बारामतीच्या पोटनिवडणुकीत विजय झाला आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती पोटनिवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले होते. मात्र, करुणा शर्मा, अभिजीत बिचुकले यांच्यासह २२ उमेदवारांनी माघार न घेतल्याने मतदान घ्यावे लागले. या निकालाची औपचारिकता बाकी होती. कार्यकर्ते, पार्थ पवार आणि जय पवारांनी व्यक्त केलेल्या अपेक्षेप्रमाणे सुनेत्रा पवारांना विक्रमी मते मिळाली.

-----------

### नेवासा येथून अल्पवयीन

अभ्यासून तपासाला गती दिली. एएचटीयूच्या टीमने बीडसह पुणे आणि अहिल्यानगर परिसरात शोध घेतला, मात्र सुरुवातीला पीडित मुलगी आणि आरोपीचा पत्ता लागला नाही. तपासादरम्यान अनेक संशयित मोबाईल क्रमांकांचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. अखेर तांत्रिक माहितीच्या आधारे पीडित आणि आरोपी नेवासा तालुक्यातील कारेगाव येथे वास्तव्यास असल्याची माहिती पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारे ५ मे २०२६ रोजी एएचटीयूचे पथक नेवासा येथे रवाना झाले. कुकाना पोलीस दूरक्षेत्रातील स्थानिक पोलिसांच्या मदतीने शोध मोहीम राबवण्यात आली. दुपारी दोन वाजेच्या सुमारास आरोपी वास्तव्यास असलेल्या ठिकाणी सापळा रचून त्याला ताब्यात घेण्यात आले. यावेळी अल्पवयीन पीडितेची सुखरूप सुटका करण्यात आली. पथकाने पीडित आणि आरोपीला घेऊन बीड गाठले आणि पुढील कार्यवाहीसाठी चकलांबा पोलिसांच्या स्वाधीन केले. ही कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनी पल्लवी जाधव, सहायक पोलीस उपनिरीक्षक मीरा रेडेकर, पोलीस हवालदार प्रदीप येवले, अशोक शिंदे, शोभा जाधव, हेमा वाघमारे आणि पोलीस शिपाई भाऊसाहेब कारले, अक्षय जाधव यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली

-------------

### वंदे मातरम'ला राष्ट्रगीतासमान

आता 'वंदे मातरम'चाही समावेश केला जाणार आहे. सरकारने हा निर्णय 'वंदे मातरम'ला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर घेतल्याचे सांगितले आहे. यासाठी कायद्याच्या कलम ३ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. त्यानुसार, राष्ट्रगीताच्या गायनात अडथळा आणल्यास तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. पुनरावृत्ती झाल्यास किमान एक वर्षाची शिक्षा अनिवार्य असेल. हेच नियम 'वंदे मातरम'लाही लागू होतील.

**मार्गदर्शक तत्त्वे जाहीर**

केंद्र सरकारने 'वंदे मातरम'च्या अधिकृत सादरीकरणासाठी मार्गदर्शक तत्त्वेही जाहीर केली आहेत. सहा कडव्यांची संपूर्ण आवृत्ती (सुमारे ३ मिनिटे १० सेकंद) प्रमुख शासकीय कार्यक्रमांत सादर करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. राष्ट्रध्वज फडकावणे, राष्ट्रपती व राज्यपालांचे औपचारिक कार्यक्रम यामध्ये याचा समावेश असेल.

**'वंदे मातरम' आधी, त्यानंतर राष्ट्रगीत**

एखाद्या कार्यक्रमात दोन्ही गीतांचे सादरीकरण असल्यास प्रथम 'वंदे मातरम' आणि त्यानंतर राष्ट्रगीत सादर करण्यात येईल. दोन्ही वेळी उपस्थितांनी आदरार्थ उभे राहणे अपेक्षित असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

-------------

### जरांगे पाटलाचा नकार

तर वावगे ठरणार नाही उद्या आमदारकी घेतली असती तर समाजाने दुर्लक्ष केले असते समाजासाठी आपण लढत आहोत आणि लढत राहणार घेतले की समाजाने दुर्लक्षित केले असते म्हणून नकार दिला असल्याचे देखील समजते पाटील यांनी हि गोष्ट समन्वयकापासून देखील दूर ठेवली असल्याची देखील माहिती आहे.

-----------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार, दि. ०७ मे २०२६



## थोडक्यात

### आज जे. के. कन्स्ट्रक्शनचा मुस्लिम धर्मीय सामूहिक विवाह सोहळा

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

बांधकाम क्षेत्रात संपूर्ण मराठवाड्यात नामवंत म्हणून ओळख असलेल्या जे. के. कन्स्ट्रक्शनने समाजहिताचा उपक्रम हाती घेतला आहे. राजकारण, सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या खान बंधूंनी मुस्लिम धर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले आहे. उद्या गुरुवार दि. ७ मे रोजी हा शाही विवाह सोहळा संपन्न होत असुन त्याची जय्यत तयारी सुरू आहे. या सोहळ्याला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जे. के. कन्स्ट्रक्शनचे संचालक जाफर खान, उपनगराध्यक्ष हाजी राजा खान यांनी केले आहे.

सामाजिक भान ठेवून, समाजाचे देणे लागतो या भावनेतून जे. के. कंट्रक्शन यांच्या वतीने गुरुवार दि. ७ मे रोजी मुस्लिम धर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. मलकापूर रोडवरील जे. के. फंक्शन हॉल येथे सकाळी ११ वाजता हा सामूहिक विवाह सोहळा थाटात आणि उत्साहात संपन्न होणार आहे. अनेक गरीब कुटुंब कर्ज काढून लग्न करतात. अनावश्यक खर्च केला जातो. हा अनावश्यक खर्च टाळून गरीब कुटुंब स्वाभिमानाने जगावे यासाठीच या सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे जे. के. कन्स्ट्रक्शनचे संचालक जाफर खान, उपनगराध्यक्ष हाजी राजा खान यांनी सांगितले.

**शाही सोहळ्याची जोरदार तयारी**

जे. के. कंट्रक्शनच्या वतीने समाजातील होतकरू कुटुंबांसाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या शाही थाटात संपन्न होणाऱ्या सामूहिक विवाह सोहोळ्याची जोरदार तयारी सुरू असून ती अंतिम टप्प्यात आली आहे. या सोहोळ्याला अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. सहभागी जोडप्यांना संसारोपयोगी साहित्यही दिले जाते. त्याचीही तयारी पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले. या विवाह सोहळ्याला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जाफर खान उस्मान खान, परळीचे उपनगराध्यक्ष हाजी राजा खान उस्मान खान, उमर खान उस्मान खान, एजाज खान उस्मान खान, वाहेद खान जाफर खान, शाहेद खान राजा खान, शेख मझहरूद्दिन अलीमोदिन, जफर खान जाफर खान, नदीम खान जाफर खान, मुफ्ती तारेक खान एजाज खान, फेरोज खान उमर खान, फाजेब खान उमर खान, तौफिक खान एजाज खान यांनी केले आहे.

### तुळजाभवानी अर्बनच्या कर्ज खातेदारास कर्ज विमा मंजुर




माजलगाव । प्रतिनिधी

तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट को ऑप क्रेडिट सो. लि च्या आष्टी शाखेचे सोनेतारण कर्ज खातेदार बागवान रसूल समद यांचे हृदय विकाराने अकाली निधन झाले असता तुळजाभवानी आर्बन संस्थेने त्यांच्या गोल्ड लोन कर्जाचा ५,००००० /( पाच लाख ) रुपयांचा इन्शुरन्स मंजूर करून दिला व सदर रक्कम कर्ज खाते जमा करून सोनेतारण तारण खाते बंद करण्यात आले.त्याच्या गहाण ठेवलेले दागिने वारसदार बागवान शाहीन रसूल(पत्नी) यांच्याकडे सुपूर्त करताना तुळजाभवानी अर्बनचे विभागीय अधिकारी सिद्धेश्वर शिंगणे,स्केल वन अधिकारी पवार दिपक, शाखा व्यवस्थापक निर्मळ निवृत्ती व गोल्ड लोन अधिकारी डिगांबर सरवदे

# प्रशासनाचा ‘कारभार’ चव्हाट्यावर

## पाटोदा पंचायत समितीच्या मीटिंग हॉलमध्ये घाणीचे साम्राज्य !

### जनतेच्या प्रश्नांवर चर्चा होणाऱ्या सभागृहातच अस्वच्छतेचे वाभाडे; नागरिकांमधून संताप व्यक्त



पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा पंचायत समिती ही तालुक्याचे केंद्र असून येथे दररोज शेकडो नागरिक आपल्या कामांसाठी येत असतात. मात्र, ज्या ठिकाणी तालुक्याच्या विकासाचे नियोजन केले जाते आणि महत्त्वाच्या बैठका पार पडतात, त्याच 'मीटिंग हॉल'मध्ये सध्या घाणीचे साम्राज्य पसरले आहे. प्रशासनाच्या या बेजबाबदार आणि दुर्लक्षित धोरणामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पंचायत समितीच्या मुख्य मीटिंग हॉलमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून नियमित साफसफाई झालेली नाही. सभागृहातील खुर्च्यांवर धुळीचे थर साचले असून, कोपऱ्यांमध्ये कचरा आणि जळमटांचे प्रमाण वाढले आहे. विशेष म्हणजे, याच हॉलमध्ये वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि ग्रामविकास यंत्रणेतील महत्त्वाच्या व्यक्तींच्या बैठका होतात. मात्र, सध्या या हॉलची अवस्था एखाद्या पडक्या खोलीसारखी झाली आहे.

आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

सभागृहात पसरलेल्या अस्वच्छतेमुळे दुर्गंधीचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे केवळ बैठकीसाठी येणाऱ्या प्रतिनिधींनाच नाही, तर तिथे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्यालाही धोका निर्माण झाला आहे. स्वच्छ भारत अभियानाच्या गप्पा मारणारे प्रशासन स्वतःच्या कार्यालयाची स्वच्छता राखण्यात अपयशी ठरत असल्याचे चित्र येथे पाहायला मिळत आहे.

नागरिकांची मागणी

स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शासकीय मालमत्तेची निगा राखणे ही संबंधित विभागाची जबाबदारी आहे. मात्र, पाटोदा पंचायत समितीचे प्रशासन झोपेचे सोंग घेत आहे का? असा सवाल नागरिक विचारत आहेत.


तात्काळ कारवाईची अपेक्षा

या गंभीर बाबीकडे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन तात्काळ स्वच्छता मोहीम राबवावी आणि यापुढे हॉलची नियमित निगा राखली जाईल याची दक्षता घ्यावी, अशी मागणी जोर धरत आहे. जर येत्या काही दिवसांत परिस्थितीत सुधारणा झाली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.

# तालखेड येथील ६० लाखांच्या दरोडा प्रकरणातील आरोपींना ‘डिफॉल्ट बेल’

### वेळेत चार्जशीट दाखल न झाल्याने न्यायालयाचा निर्णय – ॲड. अर्जुन आडे

माजलगांव ( प्रतिनिधी):- माजलगांव येथील अमोल ज्वेलर्सचे व्यावसायिक अमोल गायके यांच्यावर झालेल्या सुमारे ६० लाख रुपयांच्या दरोडा प्रकरणातील आरोपींना अखेर न्यायालयाकडून ‘डिफॉल्ट बेल’ मंजूर करण्यात आला आहे. तपास अधिकाऱ्यांकडून कायद्याने निश्चित केलेल्या मुदतीत दोषारोपपत्र (चार्जशीट) दाखल न झाल्याने न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.



दि.२५ जानेवारी २०२६ रोजी अमोल गायके हे सोन्या-चांदीचे सुमारे ६० लाख रुपये किमतीचे दागिने घेऊन तालखेड येथील बाजारात विक्रीसाठी जात होते. त्यावेळी आरोपी कृष्णा निरडे, अभिषेक शिंदे व इतरांनी मोटारसायकलवरून त्यांचा पाठलाग करून त्यांची गाडी अडवली. आरोपींनी त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करून दागिन्यांची लूट केली होती.

या प्रकरणी माजलगांव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३०/२०२६ अन्वये बी.एन.एस. कलम ३१०(२), ३०९(४), १२६(२) तसेच भारतीय शस्त्र कायदा कलम ४/२५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांनी एकूण पाच आरोपी निष्पन्न केले होते.

यापूर्वी आरोपी कृष्णा निरडे व अभिषेक शिंदे यांच्या वतीने सत्र न्यायालयात नियमित जामिनासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता.मात्र, तपास सुरू असल्याचे कारण देत न्यायालयाने तो अर्ज फेटाळला होता.दरम्यान, कायद्यानुसार अटकेपासून ९० दिवसांच्या आत, म्हणजे दि.३० एप्रिल २०२६ पर्यंत दोषारोपपत्र दाखल करणे आवश्यक होते.मात्र संबंधित मुदतीत चार्जशीट दाखल न झाल्याने आरोपींच्या वतीने ड.अर्जुन बी. आडे यांनी ‘डिफॉल्ट बेल’साठी अर्ज दाखल केला.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, माजलगांव यांनी कायदेशीर तरतुदींचा विचार करून व वेळेत दोषारोपपत्र दाखल न झाल्याच्या कारणास्तव आरोपी कृष्णा निरडे व अभिषेक शिंदे यांना डिफॉल्ट बेल मंजूर केला.या प्रकरणात ड. अर्जुन आडे यांनी प्रभावी युक्तिवाद केला. त्यांना ड. दत्ता आडे, ड. नम्रता राठोड व ड. सचिन राठोड यांनी सहकार्य केले.या निर्णयामुळे ‘डिफॉल्ट बेल’ संदर्भातील कायदेशीर तरतुदी पुन्हा एकदा चर्चेत आल्या असून तपास यंत्रणांनी वेळेत दोषारोपपत्र दाखल करण्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.



पश्चिम बंगाल, आसाम आणि पुडूचेरी येथे भाजप ची बहुमताने सत्ता आली. त्यानिमित्ताने जिल्हा भाजप च्या वतीने आम्ही आनंद उत्सव साजरा केला आणि माजी मंत्री मा. बदाम आबा पंडित यांना वाढदिवसा निमित्त शुभेच्छा देऊन अभिष्टचिंतन केले.या प्रसंगी माजी मंत्री मा. बदाम आबा पंडित,जिल्हा अध्यक्ष शंकर भाऊ देशमुख, ॲड. सर्जेराव तात्या तांदळे, माधव तात्या निर्मळ,युवा नेते योगेश भैय्या क्षीरसागर, नवनाथ आण्णा शिराळे, शिवराज भैय्या पवार यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुख्यमंत्र्यांच्या दरबारी सुरेश धसांचे वजन!

### पाटोदा तालुक्याला पीक विमा मिळवून देण्यासाठी 'कर्तव्यदक्ष आमदार' सरसावणार?

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुका हा तसा आर्थिकदृष्ट्या मागास आणि पूर्णपणे शेतीवर अवलंबून असलेला भाग. मात्र, गेल्या काही वर्षांपासून प्रशासकीय उदासीनतेमुळे येथील शेतकरी पीक विम्यापासून वंचित राहिला आहे. आता या संकटाच्या काळात पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या नजरा कर्तव्यदक्ष आमदार सुरेश धस यांच्याकडे लागल्या आहेत.पंकजा मुंडेंच्या काळातील त्या निर्णयाची आठवण:पाटोद्यातील शेतकऱ्यांच्या मते, पंकजा मुंडे राज्याच्या पालकमंत्री असताना जिल्ह्यात मोठी पीक विमा योजना राबवण्यात आली होती, ज्याचा फायदा हजारो शेतकऱ्यांना झाला होता. मात्र, त्यानंतरच्या काळात शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच आली आहे. आज पाटोद्याचा शेतकरी पुन्हा एकदा तशाच मोठ्या मदतीच्या प्रतीक्षेत आहे.देवेंद्र फडणवीसांशी असलेल्या निकटतेचा फायदा होणार?आमदार सुरेश धस यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी असलेले राजकीय वजन आणि घनिष्ठ संबंध सर्वश्रुत आहेत.



धस यांनी मनात आणले तर ते सरकारकडून पाटोद्याच्या शेतकऱ्यांसाठी विशेष पीक विमा कवच खेचून आणू शकतात, असा विश्वास सामान्य शेतकऱ्याला वाटत आहे. नुकत्याच एप्रिल २०२६ मध्ये बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी १७,५०० रुपयांच्या सरसकट विम्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमकपणे भूमिका मांडणारे नेते म्हणून धस यांची ख्याती असल्याने, ते या प्रश्नावर थेट मंत्रालयात वजन वापरतील अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.शेतकऱ्यांची आर्त साद:पाटोदा तालुका दुष्काळी आणि मागास आहे. सुरेश धस हेच आमचा आवाज मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवू शकतात. त्यांनी पुढाकार घेऊन आम्हाला पीक विमा मिळवून द्यावा, अशी भावना तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. सुरेश धस यांनी सातत्याने पीक विमा घोटाळ्यांविरुद्ध आवाज उठवल्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचा त्यांच्यावरील विश्वास वाढला आहे.आता सुरेश धस पाटोद्याच्या मागास शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना न्याय मिळवून देतात का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आदित्य कृषी महाविद्यालयात २५७ विद्यार्थ्यांना निरोप

### संस्कारांची शिदोरी घेऊन भावी अधिकारी नव्या क्षितिजाकडे




बीड । प्रतिनिधी

निरोप समारंभ हा केवळ आठवणींना उजाळा देणारा क्षण नसून नवीन संधी आणि कर्तृत्वाच्या प्रवासाची ती एक सुरुवात आहे. महाविद्यालयातील संस्कार आणि ज्ञान तुमच्या आयुष्याच्या पुढील प्रवासात नक्कीच दीपस्तंभासारखे काम करेल, स्वप्न पूर्ण करण्यासाठी अपार कष्ट करा असे प्रतिपादन आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा यांनी केले.

आदित्य कृषी महाविद्यालयात अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित निरोप समारंभ आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा हे होते. महाविद्यालयाच्या प्रांगणात हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. आदिती सारडा यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. आदिती सारडा म्हणाल्या की, आजचा दिवस संमिश्र भावनांचा आहे. विद्यार्थ्यांना निरोप देताना शिक्षकांच्या मनात हळहळ असली, तरी तुम्ही आयुष्याच्या नवीन टप्प्यावर यशस्वी व्हाल याचा आम्हाला अभिमान आहे. विद्यार्थ्यांनी या पवित्र प्रांगणात घेतलेल्या ज्ञानाच्या जोरावर आदित्य शिक्षण संस्थेचे नाव मोठे करावे. तर प्राचार्य श्याम भुतडा म्हणाले की, निरोप म्हणजे कायमचे दूर जाणे नव्हे, तर नवीन जबाबदाऱ्यांकडे वाटचाल करणे होय. आयुष्यात कितीही मोठ्या पदावर गेलात तरी माणुसकी जपा, असे आवाहन त्यांनी केले. प्राध्यापक व्हि.एस. मिसाळ यांनी प्रास्ताविकात विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअरबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा दिला. सुरज जाधव याने आपला प्रवास सांगताना संस्था नेहमीच पाठीशी उभी राहिल्याचे नमूद केले. तर सुगंधा कुंभार हिने प्राध्यापकांचे कष्ट आणि महाविद्यालयातील सर्वांगीण विकासाच्या संधींबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. ठोके, डॉ. सातपुते, डॉ. खेडकर, डॉ. मुंडे, डॉ. मोरे, प्रा. मिसाळ, डॉ. एडके, डॉ. कुमार, प्रा. गव्हाणे, प्रा. बोरडकर, प्रा. धावणे, प्रा. राऊत यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहाव्या सत्रातील विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पान ६ वरुन...

### पत्नी नांदायला येत नसल्याने

ऐकून नातेवाईक आसाराम चिंचोलकर तात्काळ घटनास्थळी धावून आले. त्यांनी आरोपीच्या हातातील डिझेलचा कॅन आणि काडीपेटी हिसकावून घेतली. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली.घटनेनंतर आरोपीने पत्नी व माहेरच्या लोकांना जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात आरोपी पतीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

### पाटोदा नगर पंचायत

अध्यक्ष बीड- सय्यद अब्दुल्ला २. माजी नगराध्यक्ष पाटोदा- बळी पोटे) या दोघांचे नगरसेवक अपात्रता प्रकरण बीड जिल्हाधिकाऱ्यांकडे गेल्या दोन वर्षांपासून निकालासाठी प्रलंबित असून, उच्च न्यायालयाने यापूर्वी देखील निर्णय जाहीर करण्याबाबत निर्देश दिले असतानाही केवळ राजकीय दबाव असल्याने हे प्रकरण निकालासाठी लाल फीतीत अडकवून ठेवण्याचे काम जिल्हा प्रशासनाकडून सुरू असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान जिल्हा प्रशासन राजकीय दबावाखाली उच्च न्यायालयाच्या निर्देशावर कारवाई करण्यात हलगर्जीपणा करत असेल तर सर्व सामान्य जनतेला जिल्हा प्रशासनाकडून काय न्याय मिळणार आहे असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित केला जात आहे.

### नसरापूर येथील बालिका

व्हायलाच पाहिजे जेणेकरून येणाऱ्या काळात देखील अशा घटना होणार नाहीत यासाठी आरोपीलां मृत्युदंडाची शिक्षा दिली व कायद्याचा धाक निर्माण झाला पाहिजे जेणेकरून येणाऱ्या काळात असे विकृत कृत्य करताना कुठल्याही व्यक्तीने हजारदा विचार केला पाहिजे. यावेळी नगरसेवक सचिन देशमुख म्हणाले खरे तर आरोपीला फाशीची शिक्षा देणे गरजेचे आहे किंवा एन्काऊंटर केले पाहिजे जेणेकरून पुढील काळात कोणीही अशी प्रत्येक करणार नाही. यावेळी निवेदन देताना दत्ता महाजन कमलेश जाबरस बप्पा देशमुख बी एन कुलकर्णी डॉक्टर शैलेश पाठक सुधीर वैद्य हिमांशू देशमुख महेश खामगावकर किसन पाटील चिंतेश जोशी संतोष काटकर अनिकेत भिलेगावकर सुनील कुलकर्णी भरत जोशी गोपाळ कुलकर्णी उपस्थित होते.

### राष्ट्रीय महामार्गावरील

थातुरमातुर बुजवण्यात येत असुन जिल्हा प्रशासनाचे याकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष असल्याचे बोलले जाते. रस्ते सुरक्षा समितीच्या अध्यक्ष आणि सचिवांच्या आदेशाला कंत्राटदारांकडून केराची टोपली

रस्ते सुरक्षासारख्या गंभीर विषयावर आयोजित केलेल्या बैठकीला व्हिडिओ कान्फरन्सद्वारे उपस्थित न राहिलेल्या सदस्यांबाबत जिल्हाधिका-यांनी तिव्र नाराजी व्यक्त करून कामात हलगर्जीपणा करणा-या संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असली तर रस्ते सुरक्षा समितीचे अध्यक्ष आणि सचिव यांच्या आदेशाला कंत्राटदारांकडून सुद्धा केराची टोपली दाखवली जाते. बीड तालुक्यातील अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावर लिंबागणेश येथील भालचंद्र विद्यालयासमोरील अपघात प्रवणक्षेत्राची दि.२६ जुन २०२५ रोजी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि रस्ता सुरक्षा समितीचे सचिव कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग रविंद्र तोंडे यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली होती.या अनुषंगाने दि.६ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने गतिरोधक बसविण्याबाबत लेखी आदेश काढले होते. ६ महिने उलटुनही अद्याप गतिरोधक बसविण्यात आले नसुन कंत्राटदाराने या आदेशाला केराची टोपली दाखवल्याचे दिसून येत आहे त्यामुळे एकंदरीतच जिल्हा प्रशासनाचे अधिकारी आणि कंत्राटदार दोघांवरही नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे.

### नात डॉक्टर झाली

त्याग केला,त्याच आज्जी उपचारासाठी रुग्णालयात आल्या होत्या आणि त्यांच्यावर उपचार करणारी डॉक्टर दुसरी कुणी नसून त्यांचीच लाडकी नात होती. आज्जीच्या मांडीवर खेळलेल्या नातीने आज स्टेथोस्कोप लावून आज्जीची तपासणी केली, तेव्हा अनेक वर्षांपूर्वी पाहिलेले स्वप्न सत्यात उतरल्याचा तो क्षण अत्यंत आल्हाददायक आणि उपस्थितांचेही डोळे पाणावणारा ठरला.

नातीकडून उपचार घेताना हृदय भरून आले!

शिवानी लहानपणापासूनच संस्कारक्षम, शांत, मितभाषी आणि अत्यंत हुशार मुलगी आहे. तिने मी सांगितलेली प्रत्येक गोष्ट पाळली. आज तिला वैद्यकीय अधिकारी म्हणून खुर्चीवर बसलेले पाहताना आणि तिच्याकडून उपचार घेताना मला मनस्वी समाधान वाटले. माझ्या कष्टाचे खऱ्या अर्थाने चीज झाले,अशी अत्यंत भावुक प्रतिक्रिया आज्जी रंगुबाई बोडखे यांनी यावेळी व्यक्त केली. तर ज्या आज्जीने माझ्यासाठी एवढे कष्ट उपसले, तिचीच आज वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवा करण्याची संधी मला मिळाली, यातच मी स्वतःला कृतकृत्य मानते अशा शब्दांत डॉ. शिवानी बोडखे- विधाते यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

### आष्टीचा जावई थेट मुंबईत

सत्कारात गौरवाचा वर्षाव

मंगळवार (दि.५) रोजी माळीवाडा येथे नागरिकांच्या वतीने तुषार तरटे यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला.

या वेळी परिसरातील मान्यवर आणि नागरिकांनी उपस्थित राहून त्यांच्या यशाचे कौतुक केले.

मान्यवरांची उपस्थिती

उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, नगरसेवक सुरेश वारंगुळे, भारत मुरकुटे, अक्षय धोंडे, बबन कदम, संदीप धोंडे, सुरज रोकडे, विजय धोंडे, उमेश धोंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.स्पष्ट संदेश!

“नोकरी सांभाळत मिळवलेले हे यश खरोखरच प्रेरणादायी आहे. तरटे यांनी सेवेत गोरगरीब जनतेसाठी न्याय देणारे काम करावे,” अशा शब्दांत रंगनाथ धोंडे यांनी अपेक्षा व्यक्त केली.

तरुणांसाठी थेट प्रेरणा

तुषार तरटे यांच्या यशामुळे आष्टी परिसरातील तरुणांमध्ये स्पर्धा परीक्षांकडे वळण्याची नवी उमेद निर्माण झाली आहे. ‘परिस्थिती नाही, जिद्द मोठी’ हा संदेश त्यांच्या यशातून ठळकपणे समोर आला आहे.

cmyk

# प्रतिटन १०० रुपयांची एफआरपी वाढवून शेतकऱ्यांची फसवणूक करू नका !

## सरकारच्या निर्णयावर शेतकरी नेते राजू शेट्टी यांचा खडा सवाल

**पुणे । प्रतिनिधी**

**राजा उधार झाला आणि हाती भोपळा दिला अशी अवस्था देशातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची झालेली आहे. पुढील २०२६-२७ हंगामात गाळपास जाणाऱ्या उसाला केंद्र सरकारने प्रतिटन ३,६५० रुपये एफआरपी जाहीर केलेली आहे. प्रतिटन १०० रुपये एफआरपी वाढविण्याचा हा निर्णय शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. वाढता उत्पादन खर्च आणि महागाई लक्षात घेता केंद्राने किमान प्रतिटनामागे ३०० रुपयांची वाढ करणे अपेक्षित होते, अशी प्रतिक्रिया स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी दिली आहे.**

केंद्राने उसाचा एक टनाचा उत्पादन खर्च १,८२० रुपये दाखवला आहे. एक टन उसाचा खर्च १,८२० रुपये आणि एफआरपी ३,६५० रुपये इतकी जाहीर केली आहे. आम्ही गेली अनेक वर्षे सरकारकडे, स्वामिनाथन आयोगाच्या सुत्राप्रमाणे उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा म्हणजे दीडपट हमीभाव देण्याची मागणी करत आहोत. पण, केंद्र सरकारने उसाचा जो प्रतिटन १,८२० रुपये खर्च दाखविला आहे; तो कोणत्या ऊस संशोधन केंद्रात अथवा विद्यापीठांत काढला, हे सिद्ध करून दाखवावे, असे आव्हान त्यांनी दिले आहे. सरकारच्या म्हणण्याप्रमाणे उत्पादन खर्च १,८२० रुपये आणि ३,६५० रुपये एफआरपी धरल्यास सरकार उत्पादन खर्च अधिक १०० टक्के नफा सरकार द्यायला लागले आहे, असे म्हणावे लागेल. एवढा नफा जर



शेतकऱ्यांना होत असेल तर आता शेतकरी चळवळीची गरजच राहिलेली नाही, असा टोला त्यांनी लगावला. सरकारकडे संशोधन करणाऱ्या अनेक यंत्रणा आहेत. भारतीय कृषी संशोधन परिषद, वेगवेगळी कृषी विद्यापीठे आणि ऊस संशोधन केंद्रे आहेत. या संशोधन केंद्राच्या जमिनीवर १,८२० रुपयांत एक टन ऊस पिकवू दाखवा आणि आम्ही उसाचा दरदेखील मागत नाही. हे जर सिद्ध करता येत नसेल तर देशातील शेतकऱ्यांची माफी मागा, अशा भूलथापा देणे बंद करा, कशाला शेतकऱ्यांची फसवणूक करताय ? असा सवाल त्यांनी दिला आहे. वर्षभरात रासायनिक खतांचे भाव वाढले आहेत. खतांवरील अनुदान कमी केले असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. सध्या एकरी जवळपास ९७ हजार रूपयांवर ऊसाचा उत्पादन खर्च जात असून यातून सरासरी ४० ते ४५ टन ऊस उत्पादन मिळते. याचाच अर्थ तोडणी वाहतूक आणि उत्पादन खर्च एकत्रित केल्यास जवळपास प्रतिटन ३ हजार रुपये खर्च होऊ लागला आहे. असे असताना केंद्र सरकार चुकीचा उत्पादन खर्च दाखवून स्वतःची पाठ स्वतःच थोपटून घेत आहे. केंद्राने किमान प्रतिटन ३०० रूपये एफआरपी वाढ करणे आवश्यक होते, असे शेट्टी यांनी म्हटले आहे. आगामी २०२६-२७ गाळप हंगामासाठी ऊस एफआरपीत केंद्राकडून प्रतिटन १०० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. यामुळे शेतकऱ्यांना प्रतिटन उसासाठी ३,६५० रुपये एफआरपी मिळेल. हा दर १०.२५ टक्के साखर उताऱ्यासाठी ऊस उत्पादकांना मिळणार आहे.

## शेतात गाळ टाकायचा असल्यास शेतकऱ्यांनी अशी खबरदारी घ्यावी



**उन्हाळा लागला की शेतामध्ये गाळ टाकण्याच्या कामांना गती येते. मातीच्या सुपीकतेसाठी गाळ टाकणे महत्त्वाचे आहे. शिवाय मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतामध्ये गाळ टाकण्याची जास्त गरज आहे. परंतु गाळ टाकताना मातीची प्रकार, गाळाचा थर, मशागत, पिकांची निवड, खत पाणी या सर्वांचे नियोजन करणे आवश्यक असते.**

उन्हाळ्यात धरण तलाव यांच्यातील पाणी आटायला लागल्यावर त्यातील गाळमाती काढून शेतासाठी वापरली जाते. परंतु गाळ टाकताना सर्वात आधी मातीचे परीक्षण करुन घ्यावे. जेणेकरुन मातीचा सध्याचा सामू किती आहे हे ओळखता येतो, तसेच त्यातील अन्नद्रव्यांचे प्रमाण समजते. याशिवाय धरणातील आणि औद्योगिक भागातील गाळ काढताना त्याचेही परीक्षण करणे आवश्यक असते. कारण औद्योगिक भागातील धरणामध्ये असणारा गाळ हा जास्त सामूचा असण्याची शक्यता असते. गाळ सहसा उथळ, मुरमाड, खडकाळ, माळरान आणि कमी खोलीच्या जमिनीत टाकावा. तो टाकण्याआधी खोल नांगरणी करुन ५ ते १० सें.मीचा ठिसूळ मुरमाचा थर तयार करावा. नांगरीनंतर निघालेले दगड वेचून शेताची बांधबंदिस्ती करावी, जेणेकरुन आपण मिसळलेला गाळ शेतातून वाहून जाणार नाही. गाळ टाकताना तो शेतामध्ये ट्रॅक्टरच्या सहाय्याने एकसारखा पसरवावा. साधारणत: गाळाच्या थराची जाडी ही १५ ते २० सेंमी इतकी असावी. जास्त जाडीचा थर ठेवल्यास गाळ आणि माती चांगल्या प्रकारे मिसळत नाही. मध्यम खोलीच्या जमिनीसाठी हेक्टरी १० टन तळ्यातला गाळ शेणखतासारखा टाकावा. तर उथळ, कमी खोलीच्या जमिनीसाठी हेक्टरी १५०० ते २००० क्युबिक मीटर प्रतिहेक्टरी म्हणजे ३०० ट्रॅक्टर ट्रॉली गाळ टाकावा लागतो. तसेच गाळामध्ये मुक्त चुन्याचे प्रमाण जास्त असते. गाळ टाकल्यानंतर तो खालच्या मातीच्या थरात मिसळल्यानंतर मुक्त चुन्याचे प्रमाण कमी होते. तसेच सभोवतालच्या परिसरातील मातीपेक्षा गाळामध्ये २० ते २५ टक्क्यांनी अन्नद्रव्यांचे प्रमाण जास्त असते. त्याचा उपयोग पिकांच्या वाढीसाठी होतो व रासायनिक खताची मात्रा कमी करण्यासाठी होऊ शकतो. कधी कधी गाळामध्ये जास्त क्षार असल्यावर जमिनीचा सामू वाढतो, त्यामुळे त्या ठिकाणी क्षारांना सहनशील असे पीक निवडावे लागते. तसेच पुढील पिकासाठी खताचे योग्य नियोजन करता येते.

## कपाशीला द्या संतुलित खते

**राज्यात सर्वसाधारणपणे ४२ लाख हेक्टर क्षेत्रावर कपाशीची लागवड होते. त्यातील ९५ % क्षेत्रावर बी.टी. वाणांची लागवड राज्यातील शेतकरी करतात. कपाशीच्या भरघोस उत्पादनासाठी सेंद्रिय खतांबरोबर, रासायनिक खतांचा वापर करणे अपरिहार्य आहे. यासोबतच मॅग्नेशियम आणि कॅल्शियम ही दुय्यम तर जस्त, बोरॉन, लोह, मँगनीज, मॉलिब्डेनम इ. सारख्या सूक्ष्म अन्नद्रव्यांची देखील थोड्या प्रमाणात आवश्यकता भासते.राज्यातील खानदेश व पश्चिम महाराष्ट्र साठी आणि विदर्भ व मराठवाडा विभागातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाचा अवलंब केल्यास उत्पादन वाढेल व जमिनीची सुपिकता टिकून राहील.**



कपाशीचे पीक सुमारे सहा महिने शेतात राहत असल्यामुळे योग्य जमिनीची निवड अत्यंत महत्त्वाची असते. कपाशी लागवडीसाठी काळी, मध्यम ते खोल (९० सें.मी) व पाण्याचा चांगला निचरा होणारी जमिन निवडावी. उथळ, हलक्या क्षारयुक्त आणि पानथळ जमिनीत कपाशीची लागवड करण्याचे टाळावे. अन्नद्रव्याची उपलब्धता व जमिनीचा सामू याचा परस्पर संबंध असल्याने जमिनीचा सामू साधारणत: ६ ते ८.५ पर्यत असावा. कपाशीच्या झाडांची मुळे जमिनीत ७० ते ९० दिवसात, ६० ते ९० सें.मी पर्यंत खोल वाढतात.कपाशीच्या मुळांची वाढ चांगली व्हावी यासाठी, एक खोल नांगरट व २ ते ३ कुळवाच्या पाळ्या देऊन ढेकळे फोडावीत. आधीच्या पिकांची धसकटे, पळकाट्या, पाला व इतर कचरा गोळा करुन तो जाळावा व शेत स्वच्छ ठेवावे. त्यामुळे कीड व रोग यांच्या सुप्तावस्था नष्ट होण्यास मदत होते.

**सेंद्रिय खते :** सेंद्रिय खतांमुळे जमिनीचा पोत सुधारतो. जलधारणाशक्ती वाढते, हवा खेळती राहते आणि अन्नद्रव्य उपलब्ध व विद्राव्य करुन देणा-या जिवाणूंची संख्या वाढण्यास मदत होते. जमिनीच्या भौतिक, रासायनिक व जैविक गुणधर्मात सकारात्मक बदल होतो. शेवटची वखरणी करण्यापूर्वी कोरडवाहू कापूस लागवडीसाठी ५ टन (१०-१२ गाड्या) शेणखत /कंपोस्ट खत अथवा २.५ टन गांडूळ खत व बागायती लागवडीसाठी १० टन (२०-२५ गाड्या) शेणखत /कंपोस्ट खत अथवा ५ टन गांडूळ खत मिसळावे. चांगले कुजलेले शेणखत/कंपोस्ट खत शेतात टाकल्यामुळे मॅग्नेशियम, झिंक इत्यादी सूक्ष्म मूलद्रव्यांचे प्रमाण वाढते. खते कमी असल्यास लागवडीच्या वेळी प्रत्येक फुलीवर छोटा खड्डा घेऊन त्यात ओंजळभर शेणखत टाकावे व मातीत चांगले मिसळावे.

**जीवाणू संवर्धक :** हवेतील नत्राचे स्थिरीकरण करुन नत्र खतांच्या मात्रेत बचत करण्यासाठी ॲझोटोबॅक्टर किंवा ॲझोस्पिरीलम या जीवाणू संवधर्काची प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम या प्रमाणात प्रक्रिया करावी. तसेच जमिनीतील मातीच्या कणांद्वारे धरुन ठेवलेले स्फुरद पिकांना उपलब्ध करुन देण्यासाठी स्फूरद विरघळणा-या जीवाणू संवर्धकाची प्रक्रिया करावी म्हणजे नत्र व स्फुरदयुक्त खताच्या मात्रेमध्ये जवळजवळ २५ ते ३० टक्के बचत होते.

**दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्ये :** नत्र, स्फुरद व पालाश या प्रमूख घटकाव्यतिरिक्त मॅग्नेशियम,गंधक या दुय्यम अन्नद्रव्याची लोह,जस्त,मॅगनीज आणि बोरॉन या सूक्ष्म अन्नद्रव्यांची सुद्धा गरज असते.माती परीक्षण करून कमतरता असलेल्या सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर तज्ञाच्या सल्ल्याने द्यावा. गंधक - २० किलो /हेक्टरी. मॅग्नेशियम सल्फेट-२० किलो /हेक्टरी. झिंक सल्फेट - २५ किलो /हेक्टरी.फेरस सल्फेट - २० किलो /हेक्टरी. बोरॅक्स - ५ किलो /हेक्टरी.

**सुक्ष्म अन्नद्रव्य देण्याची पद्धत :** एक बैलगाडी शेणखत किंवा कंपोस्ट खत डेपो सावलीत करावा. यामध्ये ५ किलो झिंक सल्फेट, ५ किलो फेरस सल्फेट, ५ किलो मँगनीज सल्फेट, १ किलो बोरॉन टाकून डेपो एकवेळ खो-याने चांगला मिसळून घ्यावा. त्यानंतर ५० लिटर पाण्यात १ किलो ॲझॅटोबॅक्टर, १ किलो ट्रायकोडर्मा व ५ किलो पीएसबी मिसळून हे द्रावण या डेपोवर शिंपडावे. परत एकदा हा डेपो चांगला मिसळून घ्यावा. हा डेपो सावलीत ७ दिवस ओलसर राहिल या पद्धतीने ठेवावा.कापूस लागवडीनंतर १८ ते २१ दिवसांदरम्यान पडणा-या पाळी बरोबर तो एक एकर क्षेत्रामध्ये जमिनीत मिसळावा.

## तूर : सुधारित वाण आणि वैशिष्टे-डॉ.आदिनाथ ताकटे, डॉ.अनिल राजगुरू

**तूर हे खरीप हंगामातील अत्यंत महत्वाचे पीक. राज्यात सर्वसाधारपणे १२ ते १३ लाख हेक्टर क्षेत्रावर अति लवकर, मध्यम लवकर आणि मध्यम ते उशिरा कालावधीच्या वाणांची निर्मिती राज्यातील कृषि विद्यापीठांनी केली आहे. तुरीच्या अधिक उत्पादनासाठी पाऊसमान आणि जमिनीचा प्रकार लक्षात घेऊन योग्य वाणांची पेरणी करणे फायदेशीर ठरते.**



तुरीच्या वाणाची निवड करताना जमिनीच्या प्रकारानुसार करणे गरजेचे असते. कारण भारी जमिनीत अधिक उत्पादन देणारे तुरीचे वाण हे मध्यम ते हलक्या जमिनीत तितकेच उत्पादन देतील असे नाही. मध्यम प्रकारच्या जमिनीकरिता कमी कालावधीत परिपक्व होणाऱ्या वाणांची निवड करावी. लट भारी जमीन असेल तर मध्यम ते उशिरा कालावधीत परिपक्व होणाऱ्या वाणाची निवड करावी. बी डी एन ७११ : मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात कोरडवाहू लागवडीसाठी,हलक्या व मध्यम जमिनीत पेरता येणारा १५० ते १५५ दिवसात तयार होणारा ,एकाच वेळी पक्व होणारा,यांत्रिक पद्धतीने काढता येणारा शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरलेला वाण . ींपांढऱ्या दाण्याचे वाण : बी डी एन ७११ ,गोदावरी ,बी एस एम आर ८५३ ींलाल/तांबड्या /तपकिरी/फिकट तपकिरी दाण्याचे वाण :फुले राजेश्वरी ,फुले तृप्ती ,फुले पल्लवी ,बी डी एन ७०८, बी डी एन ७१६, रेणुका, बी एस एम आर ७३६,,आय सी पी एल ८७, आय सी पी एल ८७११९, पी.के.व्ही तारा, पी.डी. के.व्ही .आश्लेषा,ए के.टी ८८११ . अ.नं.परिपक्वता कालावधी- दिवस १.अति लवकर परिपक्व होणारे वाण-१२५ ते १३० २.लवकर परिपक्व होणारे वाण-१३१ ते १५० ३.मध्यम लवकर परिपक्व होणारे वाण-१५० ते १६५ ४.मध्यम परिपक्व होणारे वाण-१६६ ते १८५ ५.उशिरा परिपक्व होणारे वाण-१८६ ते २०० महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी विकसित वाण फुले पल्लवी (फुले तूर १२-१९-२) प्रसारण वर्ष :२०२४ ,महाराष्ट्र ,मध्यप्रदेश ,छत्तीसगड,गुजरात आणि राजस्थान या राज्याकरिता प्रसारित पिकाचा कालावधी:१५५-१६० दिवस वैशिष्टे:मध्यम पक्वता कालावधी ,दाणे टपोरे फिकट तपकिरी ,मर व वांझ या रोगास मध्यम प्रतिकारक्षम शेंगा पोखरणारी अळी,शेग माशी या किडींना कमी बळी हेक्टरी उत्पादन:२१.४५ क्किं/हे. फुले तृप्ती प्रसारण वर्ष :२०२२, महाराष्ट्र ,गुजरात,मध्यप्रदेश , छत्तीसगड या राज्यासाठी प्रसारित पिकाचा कालावधी:१६०-१७० दिवस वैशिष्टे:दाणे आकाराने टपोरे ,दाण्याचा रंग फिक्कट तपकिरी मार व वांझ रोगास मध्यम प्रतिकारक्षम शेंगा पोखरणारी अळी आणि शेंगमाशी या किडीचा प्रादुर्भाव कमी हेक्टरी उत्पादन:२२-२३ क्किं/हे. फुले राजेश्वरी प्रसारण वर्ष :२०१२, महाराष्ट्र ,मध्यप्रदेश व गुजरात राज्याकरिता प्रसारित पिकाचा कालावधी:१४०-१५० दिवस वैशिष्टे:तांबड्या रंगाचे टपोरे दाणे , मर व वांझ रोगास प्रतिकारक्षम हेक्टरी उत्पादन: २८-३० क्किं/हे. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ ,राहुरी विकसित वाण पी.के .व्ही.तारा प्रसारण वर्ष :२०१३ पिकाचा कालावधी:१७८-१८० दिवस वैशिष्टे:दाण्याचा रंग लाल ,मर व वांझ रोगास प्रतिकारक्षम हेक्टरी उत्पादन:१९-२० क्किं/हे. पी.डी. के.व्ही .आश्लेषा प्रसारण वर्ष :२०२२ ,महाराष्ट्र ,गुजरात ,मध्यप्रदेश ,छत्तीसगड या राज्याकरिता प्रसारित पिकाचा कालावधी:१७५-१८० दिवस वैशिष्टे:दाणे टपोरे आणि लाल रंगाचे,मर,वांझ ,करपा आणि पानावरील ठिपके या रोगांना मध्यम प्रतिकारक्षम, जिरायत लागवडीसाठी योग्य हेक्टरी उत्पादन :१९-२० क्किं/हे.ए के टी ८८११ प्रसारण वर्ष :१९९५ ,विदर्भासाठी प्रसारित पिकाचा कालावधी:१३०-१४० दिवस वैशिष्टे:दाण्याच रंग लाल,मध्यम टपोरे दाणे,,मर रोगास मध्यम प्रतिकारक्षम हेक्टरी उत्पादन: १०-११ क्किं/हे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ ,परभणी बी डी एन पी एच-१८-५ प्रसारण वर्ष :२०२४ भारतातील मध्य विभाग करिता प्रसारित पिकाचा कालावधी:१५५-१७० दिवस वैशिष्टे:राज्यातील पहिला संकरित वाण,दाण्याचा रंग पांढरा,मर व वांझ रोगास मध्यम प्रतिकारक्षम हेक्टरी उत्पादन:१८ -२२ क्किंटल /हेक्टर बी डी. एन ७०८ (अमोल) प्रसारण वर्ष :२००४ मराठवाडाकरिता प्रसारित पिकाचा कालावधी:१६०-१६५ दिवस वैशिष्टे:शेंगा गर्द लाल,दाणे चमकदार लाल रंगाचे,मध्यम आकाराचे,शेंगा पोखरणाऱ्या किडीस सहनक्षम हेक्टरी उत्पादन:१६-१८ क्किंटल /हेक्टर बी.डी. एन ७११ प्रसारण वर्ष :२०११,मराठवाडा ,पश्चिम महाराष्ट्रात कोरडवाहू लागवडीसाठी शिफारस पिकाचा कालावधी:१५०-१५५ दिवस वैशिष्टे:दाणा पांढरा, हलक्या व मध्यम जमिनीस योग्य,शेंगा एकाच वेळी पक्व, यांत्रिक पद्धतीने काढता येतात,लवकर पक्व होत असल्याने रब्बीत दुबार पीक घेणे शक्य हेक्टरी उत्पादन:१६-२३ क्किंटल /हेक्टर बी.डी. एन ७१६ प्रसारण वर्ष :२०१६, महाराष्ट्र राज्याकरिता प्रसारित पिकाचा कालावधी:१६५-१७० दिवस वैशिष्टे:दाणे लाल व टपोरे , मर व वांझ रोगास प्रतिकारक्षम ,उत्तम प्रतीची डाळ पावसावर आधारित ठराविक क्षेत्रात वेळेत पेरणीसाठी योग्य हेक्टरी उत्पादन: १८-२० क्किंटल /हेक्टर गोदावरी (बी.डी.एन. २०१३ - ४१) प्रसारण वर्ष :२०२१ पिकाचा कालावधी:१६०-१६५ दिवस वैशिष्टे:पांढऱ्या रंगाचे दाणे, वाढीचा काळ निमपसरट,मर व वांझ रोगास प्रतिकारक्षम हेक्टरी उत्पादन:१९-२४ क्किंटल /हेक्टर रेणुका प्रसारण वर्ष :२०२२ महाराष्ट्र ,गुजरात ,मध्यप्रदेश ,छत्तीसगड या राज्याकरिता प्रसारित पिकाचा कालावधी:१६५-१७० दिवस वैशिष्टे:मर व वांझ रोगास प्रतिकारक्षम हेक्टरी उत्पादन: १९-२२ क्किंटल /हेक्टर बी.एस एम आर. ७३६ प्रसारण वर्ष :१९९४ पिकाचा कालावधी:१८०-१९० दिवस वैशिष्टे:दाण्याच रंग लाल, मर व वांझ रोग प्रतिकारक्षम हेक्टरी उत्पादन :१५-१६ क्किंटल /हेक्टर बी.एस एम आर ८५३ प्रसारण वर्ष :२००१ पिकाचा कालावधी:१७८-१८० दिवस वैशिष्टे:पांढरे दाणे , मर व वांझ रोग प्रतिकारक्षम हेक्टरी उत्पादन :१५-१६ क्किंटल / हेक्टर इक्रीसॅट,हैद्राबाद विकसित वाण आय सी पी एल ८७ ( प्रगती) प्रसारण वर्ष :१९८६ पिकाचा कालावधी:१२५-१३५ वैशिष्टे:दाणे,मध्यम टपोरे ,लाल रंगाचे, दुबार पीक पद्धतीस योग्य,पहिल्या भराच्या शेंगा तोडून दुसरा बहार घेता येतो,सर्व फुले एकाच वेळी येतात. हेक्टरी उत्पादन :९-१० क्किंटल /हेक्टर आय सी पी एल ८७११९ (आशा) प्रसारण वर्ष :१९९२ पिकाचा कालावधी:१८०- २०० दिवस वैशिष्टे:भारी जमिनीत लागवडीस योग्य ,उशिरा तयार होणारे वाण, दाण्याचा रंग लाल, मर व वांझ रोग प्रतिकारक्षम ,अर्ध रब्बी तुरीच्या लागवडीसाठी शिफारशीत हेक्टरी उत्पादन: १२-१४ क्किंटल / हेक्टर वरील नमूद तुरीच्या वाणाच्या बियाण्याच्या उपलब्धते संबंधित कृषी विद्यापीठ, शेतकऱ्यांच्या बीजोत्पादन कंपनी, महाबीज किंवा शासनाच्या इतर मान्यताप्राप्त कंपन्या यांच्याशी आपण संपर्क करू शकता. या संदर्भामध्ये अधिक माहिती संबंधितांकडून प्राप्त होऊ शकते. तुरीच्या वाणाची निवड करताना घ्यावयाची महत्वाची काळजी. जमिनीचा प्रकार, संरक्षित ओलिताची सोय , वाणाचा परिपक्वता कालावधी व मर व वांझ रोगाचा होणारा प्रादुर्भाव या सर्व बाबी लक्षात घेऊन तुरीच्या वाणाची निवड करावी. कोरडवाहू क्षेत्रात तुरीच्या वाणाची निवड करताना कमी कालावधीत येणारे, अवर्षण प्रतिकारक्षम,कीड व रोगांना कमी बळी पडणारे वाण निवडावेत. काही महत्वाच्या तूर वाणाची वैशिष्ट्ये वर निर्देशीत केली असली तरीही अधिक उत्पादनाकरिता केवळ वाणावर विसंबून न राहता एकात्मिक पीक व्यवस्थापन तंत्राचा अवलंब करून उत्पादनात वाढ करणे शक्य आहे. तुरीच्या वाणाची निवड करताना,कृषी विद्यापीठानी, संबंधित विभागाकरिता शिफारशीत केलेले वाण तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली निवडावे

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८४९ : जॉन इलियट ड्रिंकवॉटर बेथुन यांनी कलकत्ता फिमेल स्कूल सुरू केले.
१८७८ : पुण्यात पहिले मराठी ग्रंथकारांचे संमेलन म्हणजे आताचे साहित्य संमेलन भरविण्यात आले.
१९०७ : मुंबईमध्ये विजेच्या शक्तीवर चालणारी पहिली ट्रॅम सुरु झाली.
१९२८ : ब्रिटन देशातील मतदाराची वयोमर्यादा ही ३० वर्षावरून कमी करून २१ वर्ष करण्यात आली.
१९४० : विन्सटन चर्चिलन यांची ब्रिटनच्या पंतप्रधान पदी नियुक्ती करण्यात आली.
१९४६ : सोनी ह्या कंपनी ची स्थापना झाली.
१९५५ : एअर इंडिया ची मुंबई टोकियो विमानसेवा सुरू झाली.
१९७६ : होंडा एकॉर्डा या गाडी प्रकाशित करण्यात आली.
१९९० : लता मंगेशकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान.
१९९२ : एन्डेव्हर हे अंतराळयान आपल्या पहिल्या मोहिमेवर निघाले.
१९९८ : मर्सिडीज-बेंज कंपनी ने क्रिस्लर हि कंपनी ४० अब्ज अमेरिकन डॉलर्स मध्ये विकत घेतली ही इतिहासातील सर्वात मोठी औद्योगिक विलीनीकरण आहे.
२००० : व्लादिमीर पुतिन रशियाचे राष्ट्राध्यक्ष बनले.
२००४ : नेपालचे तत्कालीन पंतप्रधान सूर्य बहादूर थापा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.
२००० : कोची येथे झलेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत तिरुअनंतपुरमचा नऊ वर्षाचा बुद्धिबळपटू अर्जुन विष्णुवर्धन याला भारतातील सर्वात लहान फिडे मास्टर होण्याचा मान मिळाला.
२०१२ : रशियाचे माजी राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांनी तिसऱ्यांदा रशियाच्या राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९२ : युगोस्लाव्हिया सोशलिस्ट फेडरल रिपब्लिकचे माजी अध्यक्ष व क्रांतिकारक जोसेफ टिटो यांचा जन्मदिन.
१८६१ : पहिले भारतीय नोबेल पुरस्कार विजेते रबिंद्रनाथ ठाकूर तथा टागोर यांचा कलकत्ता येथे पिराली ब्राम्हण कुटुंबात जन्म. (मृत्यू: ७ ऑगस्ट १९४१)
१८८० : भारतरत्न पांडुरंग वामन काणे यांचा जन्म. (मृत्यू: १८ एप्रिल १९७२)
१८९२ : क्रांतिकारक आणि युगोस्लाव्हियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष जोसेफ टिटो यांचा जन्म. (मृत्यू: ४ मे १९८०)
१९०९ : पोलरॉइड कॉर्पोरेशनचे संस्थापक एडविन एच. भूमी यांचा जन्म. (मृत्यू: १ मार्च १९९१)
१९१२ : ज्ञानपीठ पारितोषिक विजेते गुजराथी कथा-कादंबरीकार पन्नालाल पटेल यांचा जन्म. (मृत्यू: ६ एप्रिल १९८९ अहमदाबाद, गुजरात)
१९२३ : आत्माराम भेंडे, मराठी अभिनेता, दिग्दर्शक, लेखक.
१९४८ : मैहर घराण्याचे बासरी वादक नित्यानंद हळदीपूर यांचा जन्म.
१९६९ : उत्तरप्रदेश राज्याचे उपमुख्यमंत्री व भारतीय जनता पक्षाचे सदस्य केशव प्रसाद मौर्य यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९२४ : भारतीय कार्यकर्ते अलायरी सीताराम राजू यांचे निधन.
१९९१ : लोककवी मनमोहन उर्फ गोपाल नरहर नातू यांचे पुणे येथे निधन. (जन्म: ११ नोव्हेंबर १९११)
१९९४ : ध्रुपद गायक उस्ताद नसीर झहिरुद्दिन डागर यांचे निधन.
१९९९ : भारतीय महाराष्ट्रीयन मराठी कवी मनमोहन उर्फ गोपाल नरहर नातू यांचे निधन.
२००१ : लेखिका मालती बेडेकर ऊर्फ विभावरी शिरुरकर यांचे निधन. (जन्म: १८ मार्च १९०५)
२००१ : गीतकार, पद्मश्री पुरस्काराने सन्मानित प्रेम धवन यांचे निधन. (जन्म: १३ जून १९२३ अंबाला, पंजाब)
२००२ : दुर्गाबाई भागवत, मराठी लेखिका, लोक संस्कृती तसेच लोकसाहित्याच्या संशोधक, लेखन विचार स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या.

## फवारणी करताना शेतकऱ्यांनी अशी खबरदारी घ्यावी

भारतातील शेतीसाठी आज औषध फवारणी (डीरूिलपस) हे एक अत्यंत महत्त्वाचे आणि नित्याचे काम आहे. पण चुकीच्या पद्धतीने फवारणी केल्यामुळे उत्पादनात घट, कीटकनाशकांचा प्रतिकार, पर्यावरणीय नुकसान आणि शेतकऱ्यांचे आरोग्य धोक्यात येते. म्हणूनच फवारणी करत असताना शेतकऱ्यांनी विविध प्रकारची खबरदारी घेणे गरजेचे आहे.

**अंदाजाने औषध मोजणे :**

बऱ्याच शेतकऱ्यांमध्ये ही सवय दिसते की औषध अंदाजानेच मोजून टाकले जाते- दरवेळी इतकंच टाकतो, किंवा शेजाऱ्याने सांगितलंय, अशा पद्धतीने. चुका करण्याची सवय लागलेली असते. मात्र यामुळे पिकांना नुकसान होते.अवांछित रासायनिक अवशेष निर्माण होतात आणि खर्चात अनावश्यक वाढ होते. त्यावर उपाय म्हणजे कंपनीच्या शिफारशी प्रमाणेच डोस मोजा. आणि मोजमाप करणे ही वैज्ञानिक प्रक्रिया समजून घ्या.

**कोणतंही पाणी वापरणं :**

थेट विहिरीचं पाणी, साठलेलं पाणी वापरणं हे सामान्य आहे. मात्र यामुळे औषध योग्यरीत्या विरघळत नाही. शिवाय परिणामकारकता कमी. ड्रिप किंवा स्प्रे नोजल अडकतात. यासाठी शुद्ध व स्वच्छ पाणी वापरा. पीएच लेव्हल तपासून फवारणीसाठी योग्य पाणी निवडा.

**एकाच औषधाचा वारंवार वापर :**

सतत एकच कीटकनाशक किंवा बुरशीनाशक वापरणं. यामुळे कीटकांची औषधाला प्रतिकारशक्ती विकसित होते. त्या औषधाचा परिणाम हळूहळू शून्यावर येतो म्हणून यासाठी औषधांची फेरपालट करा. विविध प्रकारची औषधे वापरा, डॉक्टर/तज्ज्ञ सल्ल्यानुसार.

**सुरक्षेकडे पूर्णतः दुर्लक्ष :**

मास्क न घालणे, चप्पल घालून फवारणी करणे, हात न धुता जेवण करणे. त्यामुळे कीटकनाशक त्वचेमार्फत शरीरात प्रवेश करतात. गंभीर आजार किंवा दीर्घकालीन आरोग्य समस्यांना आमंत्रण. त्यामुळेसुरक्षा साधने ( पीपीई किट , मास्क, हातमोजे, गॉगल्स) वापरा.फवारणीनंतर हात-पाय, कपडे स्वच्छ धुवा.

**हवामानाचा विचार न करणे :**

वारंवार फवारणी करताना हवामान बघितलं जात नाही. असे केले तर वारा, पाऊस यामुळे औषध उडून जातं. यातून खर्च वाढतो, परिणाम मिळत नाही. म्हणून थंड, वाऱ्याचं प्रमाण कमी असलेला दिवस निवडा. सकाळी किंवा संध्याकाळी फवारणी करा. फवारणीनंतर हात-पाय, कपडे स्वच्छ धुवा.

# इज्तेमाई शादियाँचा आदर्श : १५५ जणांचा सामूहिक निकाह

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**अनावश्यक खर्चाला लगाम घालत साधे-पणातून सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा इज्तेमाई शादियाँ (मुस्लिम सामूहिक विवाह सोहळा) सिल्लोड येथे उत्साहात पार पडला. या सोहळ्यात तब्बल १५५ जणांचा निकाह संपन्न झाला. वर्षभरात विविध ठिकाणच्या आयोजनातून ५५५ सामूहिक विवाहाचा टप्पा पूर्ण केला असून पुढील वर्षी शहरात विक्रमी सामूहिक विवाह सोहळा संपन्न करण्याचा आयोजकांचा मानस असून, आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकारातून गेल्या सुमारे २५ वर्षांपासून सुरू असलेला हा उपक्रम आज समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.**



या मंगल प्रसंगी आमदार अब्दुल सत्तार, अक्कलकुवा येथील मौलाना हुजेफा वस्तानवी, मौलाना मोहम्मद नसीम, नगराध्यक्ष अब्दुल समीर, जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, मेडिकल कॉलेजचे संचालक तथा जि.प. सदस्य अब्दुल आमेर, निवृत्त जिल्हा निबंधक तथा जीप सदस्य देविदासराव पालोदकर, शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव तायडे,माजी उपसभापती सय्यद अजिज बागवान, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, प्रशासकीय अधिकारी रईस खान, माजी चेअरमन रामदास पालोदकर, सत्तार बागवान, नगरसेवक डॉ. फिरोज खान, रऊफ बागवान, सिद्धेश्वर आहेर आदींनी आशीर्वाद दिले. तसेच आसिफ बागवान, शेख इम्रान गुड्डू, जुम्माखा पठाण, विशाल जाधव, अकिल वसईकर, बबलू पठाण, मिझी चांदबेग, सत्तार हुसेन, शेख बावर, बाजार समितीचे संचालक दामूअण्णा गव्हाणे, देविदास लोखंडे, माजी उपनगराध्यक्ष शंकरराव खांडवे, विनोद मंडलेचा, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, प्रताप प्रशाद, मधुकर गवळी, राजेंद्र ठोंबरे, संजय डमाळे, अक्षय मगर आदी मान्यवरांनीही उपस्थित राहून नवदाम्पत्यांना शुभाशीर्वाद दिले.

आ. अब्दुल सत्तार यांनीही सध्याच्या परिस्थितीत सामूहिक विवाहाची गरज अधोरेखित करत, लग्नसमारंभातील अवाजवी खचर्चामुळे कर्जबाजारीपणा वाढतो. हा अपव्यय टाळून प्रत्येक समाजाने सामूहिक विवाहाची कास धरली पाहिजे, असे मत व्यक्त केले.

# चोरट्यांचा उच्छाद; सेव्हनहिल जवळ चार दुकाने फोडली

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

शहरात घरफोड्या, चोऱ्या आणि सोनसाखळी हिसकावण्याच्या घटनांनी अगोदरच उच्छाद मांडला असताना, आता पुरट्या चोरट्यांनी आपला मोर्चा थेट मुख्य रस्त्यावरील व्यावसाविक संकुलांकडे वळवला



आहे. शहरातील गजबजलेल्या जालना रोडवरील नुपूर सिनेमा कॉम्प्लेक्समधील तब्बल चार दुकाने सोमवारी (दि. ४) मध्यरात्री फोडल्याची घटना उघडकीस आली आहे. चोरट्यांच्या या वाढत्या धाडसामुळे व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. याप्रकरणी सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


फिर्यादी ॲड. सतीश फकीरचंद गाजरे (३३, रा. चिकलठाणा) यांच्या फिर्यादीनुसार, सेव्हनहिल जवळ नुपूर सिनेमा कॉम्प्लेक्समधील शॉप नं. १ मध्ये सुनील अग्रवाल यांचे यशोदा टूर्स अँड ट्रॅव्हल्स आणि ॲड. गाजरे यांचे वकिली व्यवसायाचे कार्यालय आहे. सोमवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास ते कार्यालय बंद करून घरी गेले होते. मंगळवारी सकाळी एका मित्राने फोन करून त्यांच्या कार्यालयाचे कुलूप तुटल्याची माहिती दिली.

या माहितीनंतर ॲड. गाजरे यांनी तातडीने कार्यालयात धाव घेतली असता, दुकानाचे शटर उचकटलेले दिसले, चोरट्यांनी कार्यालयातील केबिनचे कुलूप तोडून ड्रॉव्हरमध्ये ठेव लेली २ हजार रुपयांची रोकड लांबवल्याचे समोर आले. यासोबतच चोरट्यांनी शॉप नं. ७ मधील डॉ. रमेश जैन यांचे साई रिअल इस्टेट हे दुकानही फोडले असून, तेथून ५५ हजार रुपयांची रोकड लंपास केली आहे. याशिवाय, याच कॉम्प्लेक्समधील मास्टर यश कॅटरर्स आणि वेदांत राजहंस ट्रॅव्हल्स ही दुकानेही फोडण्यात आली. मात्र तेथे चोरट्यांच्या हाती काहीच न लागल्याने त्याने रिकाम्या हाताने पोबारा केला. त्यामुळे या दुकानांच्या मालकांनी कोणतीही तक्रार दिली नसल्याचे सिडको पोलिसांनी सांगितले.

# शासकीय कार्यालयामध्ये खाजगी व्यक्तीने हस्तक्षेप करू नये -जिल्हाधिकारी मित्तल

**जालना । प्रतिनिधी**

**जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज जिल्ह्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांचा व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. बैठकीत जिल्हाधिकारी यांनी सर्व ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांना गावपातळीवरील समन्वय अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या.**



बैठकीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांना नागरिकाभिमुख आणि पारदर्शक प्रशासनासाठी कटिबद्ध राहण्याचे निर्देश दिले. विहित कालमर्यादेमध्ये सर्व प्रकारचे फेर फारची निर्गती होईल याची दक्षता घ्यावी. कार्यालयाच्या दर्शनी भागात उपस्थिती व भेटीचे वेळापत्रक स्पष्टपणे नमूद करण्याच्या सूचना दिल्या. तसेच तालुका किंवा जिल्हास्तरीय बैठकीसाठी बाहेर जाणार असल्यास संबंधित गावकऱ्यांना पूर्वकल्पना देणे आवश्यक असल्याचे सांगितले.

महसूल संबंधित प्रकरणांमध्ये विलंब होऊ नये यासाठी फेरफारसारखी सर्व कामे विहित कालमर्यादेत पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला. कार्यालयीन कामकाजात कोणत्याही खाजगी व्यक्तीचा हस्तक्षेप असू नये, असे स्पष्ट निर्देश दिले.

यासोबतच, शासकीय वापरातील युजर आयडी आणि डिजिटल स्वाक्षरी कोणत्याही परिस्थितीत खाजगी व्यक्तींना देऊ नयेत, अन्यथा संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, अशा सूचना दिल्या.

नागरिकांकडून शासनाने निश्चित केलेल्या शुल्काव्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही, याची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याचे आदेशही देण्यात आले. महसूल प्रशासन अधिक पारदर्शक, जबाबदार आणि जनहिताभिमुख करण्यासाठी दिलेल्या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी केले.

# एलसीबीचे बाळ आणि राम मोहनप्यारे हप्तेखोरी करत गुन्हेगारीचे अर्थकरण ?

## एसपी ममूक्का सुदर्शन हे बाळ आणि राम मोहनप्यारे यांचे निलंबन करणार ?

पाथर्डी । प्रतिनिधी

अहिल्यानगर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग एलसीबी विभागातील कार्यरत असणारे दोन कर्मचारी बाळ आणि राम मोहन प्यारे ( टोपण नावे ) सर्रासपणे पाथर्डी तालुक्यातील चालणाऱ्या अवैध धंद्यावाल्यांकडून लाखो रुपयांची हप्ते खोरी करत आहेत त्यांना हप्ते पुरवणारा स्वयंघोषित पोलीस मित्र आहे जो बाळ आणि राम मोहनप्यारे यांना प्रत्येक महिन्याला लाखो रुपयांचा हप्ता गोळा करून ऑनलाईन आणि रोख स्वरूपात पैसे जमा करून देतो तो स्वतः पोलीस मित्र असल्याचे बतावणी करतो पाथर्डी पोलीस ठाण्यातील कर्मचारी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागातील कर्मचारी याच्याशी त्याचे हितसंबंध असल्याने तो पोलीस मित्र स्वतः अवैध धंदे करतो पाथर्डी तालुक्यात गुटखा पुरवणारा पोलीस मित्र म्हणून त्याची ओळख आहे जुगार मटके वाळू गुटखा मावा दारूचे हातभट्टी चालवणारे अड्डे गांजा इत्यादी बेकायदेशीर धंदे जे करतात त्यांच्याशी या दोन बाळ आणि राम मोहनप्यारे यांचे आर्थिक हितसंबंध आहेत प्रत्येक महिन्याच्या चार किंवा पाच तारखेला हे पाथर्डी तालुक्यात खाजगी वाहनाने व सिव्हिल ड्रेसवर येतात आणि अवैध धंदे करणारे सर्वांकडून हप्ते वसूल करतात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागातील कार्यरत बाळ आणि राम मोहनप्यारे हे अवैध धंदे करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्याच्या ऐवजी गुन्हेगारीचे अर्थकारण करत असल्याने अहिल्यानगर येथे कर्तव्यदक्ष आणि दबंग पोलीस अधीक्षक म्हणून हजर झालेले ममुक्का सुदर्शन हे या हफ्तेखोर आणि पोलिसांची प्रतिमा मलिन करणाऱ्या बाळ आणि राम मोहनप्यारे यांच्यावर थेट निलंबनाची कारवाई करणार का असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे कायद्याचे रक्षण करणारे गुन्हेगारीला आळा घालणारे रक्षक हे गुन्हेगाराचे व गुन्हेगारीचे थेट समर्थन करत असल्याने अहिल्यानगर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग एलसीबी विभागाच्या कार्यपद्धतीवर शिंतोडे उडत असल्याने हप्ते खोरी करून शासनाची व पोलीस प्रशासनाची दिशाभूल करून स्वतःची करोडो रुपयांची माया जमा करणाऱ्या बाळ आणि राम मोहनप्यारे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे यासंदर्भात पोलीस अधीक्षक ममूक्का सुदर्शन यांच्याकडे अहिल्यानगर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागातील बाळ आणि राम मोहनप्यारे यांची लेखी तक्रार करून यांची खातेनिहाय चौकशी करून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात येणार आहे.

# नांदेड मनपाकडून अतिक्रमणांवर पोलिस बंदोबस्तात हातोडा

नांदेड । प्रतिनिधी

नांदेड महापालिकेने विविध भागांत रस्त्यावर अतिक्रमण करणाय़ांवर आठ दिवसांपासून कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. वाघी रस्त्यावरील अतिक्रमण काढत असताना सोमवारी अतिक्रमण करणाय़ांनी जेसीबी चालकाला बेदम मारहाण केली होती. या प्रकरणात मंगळवारी दि. ५ रोजी सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, मनपाने दुसय़ा दिवशीही वाघी रस्त्यावरील अतिक्रमण दोन जेसीबी लावून पोलिसांचा मोठा फौजफाटा घेऊन जमीनदोस्त केले. यावेळी काही काळ तणाव निर्माण झाला होता. पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला. याबाबत अधिक माहिती अशी की, नांदेड शहरात वाढते अतिक्रमण ही डोकेदुखी ठरत असल्याने अतिक्रमण विरोधी पथकाने अतिक्रमण काढण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर आठ दिवसांपासून विविध भागातील अतिक्रमण काढण्याची मोहीम सुरू आहे. सोमवारी वाघी रस्त्यावर अतिक्रमण काढत असताना अतिक्रमण करणाय़ांत आणि महापालिकेच्या कर्मचाय़ांत वादावादी झाली त्याचे पर्यावसान हाणामारीत झाले. अतिक्रमण करणाय़ांनी चक्क जेसीबी चालकाला बेदम मारहाण केली होती. या मारहाणीत जेसीबी चालक गंभीर जखमी झाला होता. त्यानंतर मंगळवारी महापालिकेचे कर्मचारी विशाल सोनकांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सहा जणांविरोधात शासकीय कामात अडथळा व इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अतिक्रमण काढण्यास विरोध झाल्याने मंगळवारी अतिक्रमण विभागाचे उपायुक्त अजितपालसिंघ संधू यांनी मोठा फौजफाटा घेऊन सकाळीच अतिक्रमणांवर हातोडा चालवला याला अतिक्रमण करणाय़ांनी तीव्र विरोध केला, त्यामुळे महापालिकेचे पथक व अतिक्रमणकर्ते आमने सामने झाले त्यांच्यात वाद होत होता. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी गर्दी पांगवण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला. दरम्यान, गेल्या अनेक वर्षांपासून वाघी रस्त्यावर छोटे मोठे व्यवसाय टाकून रस्ते गिळंकृत केले होते. महापालिकेने ठोस भूमिका घेत अतिक्रमण काढल्याने रस्त्यांनी आता मोकळा श्वास घेतला आहे. यामुळे आता वाहतुकीची समस्या कमी होणार आहे.

# पाणीटंचाईवर मात करत डोमेगावच्या शेळके दांपत्याने फुलवली वनराई

अंबड । प्रतिनिधी

निसर्गाचा लहरीपणा आणि भीषण पाणीटंचाई अशा दुहेरी संकटात जिथे उभ्या पिकांना जगवणे कठीण असते तिथे अंबड तालुक्यातील डोमेगाव येथील एका प्रयोगशील दांपत्याने आपल्या अतोनात कष्टाने 'घनदाट वनराई' फुलवण्याचे स्वप्न सत्यात उतरवले आहे. बाबासाहेब शेळके आणि सौ.सविता शेळके या दांपत्याच्या या जिद्दीचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.



## कृषी विभागाने पाहणी करून केले कौतुक

अंबड तालुक्यात उन्हाची तीव्रता वाढत असताना अनेक ठिकाणी पाण्याचे स्त्रोत आटले आहेत. मात्र, डोमेगाव येथील बाबासाहेब शेळके आणि त्यांच्या पत्नी सविता शेळके यांनी खचून न जाता उपलब्ध पाण्याचे सूक्ष्म नियोजन केले.अगदी टंचाईच्या काळातही पाण्याचा थेंब न्? थेंब जपून वापरत त्यांनी आपल्या परिसरातील वनराई हिरवीगार ठेवली आहे. केवळ झाडे लावून न थांबता, ती मुलांप्रमाणे जोपासण्याचे काम या दांपत्याने सातत्याने केले आहे.

दरम्यान शेळके दांपत्याच्या या स्तुत्य उपक्रमाची माहिती मिळताच कृषी सहाय्यक दिव्या तळेकर यांनी डोमेगाव येथे भेट दिली. यावेळी त्यांनी संपूर्ण वनराईची पाहणी केली.अत्यंत कष्टाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने जोपासलेली ही वनराई पाहून त्यांनी आश्चर्य व्यक्त केले.

आजच्या काळात जेव्हा वृक्षतोड मोठ्या प्रमाणावर होत आहे, तेव्हा शेळके दांपत्याने उन्हाळ्यात पाणीटंचाई असतानाही इतकी घनदाट वनराई जोपासणे ही बाब इतरांसाठी प्रेरणादायी आहे. पर्यावरण संवर्धनाचा हा आदर्श प्रत्येकाने डोळ्यासमोर ठेवायला हवा,अशा शब्दांत दिव्या तळेकर यांनी शेळके कुटुंबाचे कौतुक केले. वाढत्या तापमानामुळे निसर्गाचा समतोल बिघडत असताना डोमेगावच्या या वनराईमुळे वातावरण शितल वाटते. शेळके दांपत्याने दाखवून दिले की, जर जिद्द आणि मेहनतीची जोड असेल, तर निसर्गही साथ देतो. त्यांच्या या कार्याबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होते. विशेष म्हणजे पर्यावरण संतुलित राखण्यासाठी केलेल्या कार्याबद्दल त्यांचा यापूर्वी शासनाकडून वनश्री पुरस्काराने सन्मानही करण्यात आलेला आहे.

# शिंगोलीत उभा राहणार १०६ मिटरचा रेल्वे पूल !

धाराशिव । प्रतिनिधी

जिल्ह्यातील दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेल्या धाराशिव-तुळजापूर रेल्वे मार्गाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे.

प्रकल्पातील अत्यंत कठीण आणि त्याचा टप्पा असलेल्या शिंगोली जवळील नापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावरील रेल्वे ाचे काम आता प्रगतीपथावर आहे. विशेष गजे, मध्य रेल्वेच्या इतिहासातील हा र्धिक लांबीचा १०६ मीटर लांचीचा पल स्पॅन पूल ठरणार असल्याची माहिती बचे उपाध्यक्ष तथा आमदार जिगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

सोलापूर-तुळजापूर-धाराशिव ४४ किमी लांबीच्या नवीन रेल्वे लाईनचे नाच्या प्रगतीचा आमदार राणाजगजितसिंह वेल यांनी शिंगोली याठिकाणी प्रत्यक्ष या कामाच्या ठिकाणी जाऊन आढावा घेतला. सध्या हे काम वेगाने सुरू आहे. या प्रकल्पाचा धाराशिव ते तुळजापूर हा पहिला टप्पा मार्च २०२७ पर्यंत पूर्ण होण्याचे उद्दिष्ट आहे. तर, सोलापूर ते तुळजापूर हा दुसरा टप्पा त्यानंतर पूर्ण केला जाणार आहे.

यामुळे तुळजाभवानीच्या दर्शनासाठी देशभरातून येणाऱ्या भाविकांचा प्रवास अधिक सुखकर होणार आहे. पहिल्या टप्प्यातील प्रकल्पांतर्गत शिंगोली येथे सोलापूर-धुळे या राष्ट्रीय महामार्गाला क्रॉस करणारा भव्य पूल बांधण्यात येत आहे. तांत्रिकदृष्ट्या हा पूल अतिशय भव्य असून, दोन खांबांमधील अंतर तब्बल १०६ मीटर इतके असणार आहे.

एवढ्या मोठ्या अंतराचा सिंगल स्पॅन अस लेला हा मध्य रेल्वेचा पहिलाच पूल असल्याचे सांगितले जात आहे. पुढील ८-९ महिन्यांत हे काम पूर्ण होणार असून सध्या या ठिकाणी ड्रिलिंग आणि पायाभरणीचे काम वेगात सुरू आहे. पुलाचे काम पूर्ण होण्यासाठी साधारणपणे ३ महिन्यांचा कालावधी अपेक्षित असून, त्यानंतर लॉन्चिंग आणि इतर प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी ८ ते ९ महिने लागणार आहेत. यासाठी आधुनिक मशिनरी आणि तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे.

कामादरम्यान महामार्गावरील वाहतुकीचे नियोजन करून पुलाच्या उभारणीचे टप्पे पूर्ण केले जाणार आहेत. या प्रकल्पाच्या प्रगतीमुळे धाराशिवकरांच्या रेल्वे स्वप्नाला आता नवी गती मिळाली असून, स्थानिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

# स्व-गणना मोहिमेत नागरिकांनी सहभाग नोंदवावा मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांचे आवाहन

मंठा । प्रतिनिधी

भारत सरकारच्या वतीने जनगणना २०२७ ची प्रक्रिया डिजिटल पद्धतीने राबवण्यात येत असून, महाराष्ट्रात पहिल्या टप्यातील घरयादी व घरगणना प्रक्रियेदरम्यान नागरिकांसाठी ''स्व-गणना'' ही अभिनव सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असल्याची माहिती मुख्याधिकारी व नगराध्यक्ष वंदनाताई बोराडे यांनी दिली.

देशाच्या सर्वांगीण विकासासाठी, अचूक नियोजनासाठी आणि भविष्यातील घोरणनिर्मितीसाठी जनगणना अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून, जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्यातील स्व-गणना मोहीम १ मे ते १५ मे या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या अभियानात नागरिकांनी घरी बसून ऑनलाइन पद्धतीने उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन मंठा तहसीलदार सुमन मोरे यांनी केले आहे. आमची जनगणना, आमचा विकास'' या संकल्पनेतून प्रत्येक नागरिकाने स्वतःहून स्व-गणना प्रक्रियेत सहभागी होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांनी स्वतःची, कुटुंबाची माहिती अचूकपणे नोंदविल्यास शासनाला शिक्षण, आरोग्य, रोजगार, शेती, उद्योग, परिवहन, गृहनिर्माण आणि पायाभूत सुविधा यांसारख्या विविध क्षेत्रांसाठी योग्य योजना आखण्यास मोठी मदत होणार आहे. आपण भरलेले माहिती हे गोपनीय व सुरक्षित राहिल.

नागरिकांनी अधिकृत संकेतस्थळ ला भेट द्यावी. त्यानंतर मोबाईल क्रमांकाच्या माध्यमातून ओटीपी द्वारे लॉग-इन करून राज्य, जिल्हा व स्थानिक तपशील निवडावेत. डिजिटल नकाशावर स्वतःच्या घराचे स्थान चिन्हांकित करून घर व कुटुंबाशी संबंधित ३४ प्रश्नांची माहिती भरून अर्ज सादर करावा. अर्ज यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना एसइआयडी प्राप्त होईल. सदरील मिळालेला एसइआयडी हे क्रमांक सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. १५ मे ते १४ जून या दरम्यान प्रत्यक्ष प्रगणक आपल्या घरी घर गणना करण्यासाठी येतील तेव्हा त्यांना हा एसइआयडी क्रमांक दाखवावा. प्रगणक आपण दिलेल्या आयडी वरुन घर गणना करतील. आवश्यक वाटल्यास आयडी मधील भरलेल्या माहितीची खात्री करतील.

नागरिकांनी दिलेली सर्व माहिती ती केवळ पूर्णपणे गोपनीय आणि सुरक्षित ठेवण्यात येणार असून ती के शासकीय कामकाजासाठीच वापरण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

तहसील प्रशासनाच्या वतीने नागरिकांनी आपल्या कुटुंबीयांना, नातेवाईकांना, मित्रपरिवाराला तसेच सामाजिक माध्यमे, व्हॉट्सअँप गट, शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था आणि युवक मंडळांच्या माध्यमातून जनजागृती करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. देशाच्या प्रगतीचा, विकासाचा आणि समृद्धीचा पाया मजबूत करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने दरम्यान स्व-गणनेत सहभागी होऊन राष्ट्रनिर्मितीच्या या महत्त्वपूर्ण लोकोत्सवात योगदान द्यावे, असे आवाहन मुख्याधिकारी व नगराध्यक्ष वंदनाताई वैजनाथ बोराडे यांनी केले.

**कोर्ट विद्यमान श्री रमेश पागोटे, तहसीलदार तथा घनसावंगी, यांचे न्यायालय**

**रा.मा.क्र.३०१/जन्म, मृत्यू नोंद २०२६-२७**
**मौजे उक्कडगाव ता.घनसावंगी जि.जालना**

**जाहिरनामा**

मौजा-उक्कडगाव, ता. घनसावंगी, जि.जालना येथील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते को, अर्जदार श्री.पंडीत साहेबराव कांबळे, रा. उक्कडगाव, ता. घनसावंगी, जि.जालना यांनी या कार्यालयास अर्ज सादर केलेला असून यांनी त्याच्या वडील नावे साहेबराव ग्यानोबा कांबळे यांचा/हिचा मृत्यु दि.०६/०६/१९९७ रोजी, मौजा उक्कडगाव येथे मृत्युची नोंद घेण्यात आलेली नाही. ग्रामपंचायत उक्कडगाव, ता.घनसावंगी, जि. जालना येथे मृत्युची नोंद होण्याकरीता आदेश मिळण्याबाबत अर्ज सादर केले आहे. तरी अर्जदार यांनी त्याचे वडील नावे साहेबराव ग्यानोबा कांबळे यांचा/ हिचा मृत्युची नोंद करण्याबाबत. आदेश देण्याबाबत कोणाला आक्षेप अथवा उजर घ्यावयाचे असतील त्यांनी पंधरा दिवासापर्यंत आपले आक्षेप अथवा उजर तहसिल कार्यालय, घनसावंगी येथे कार्यालयीन वेळेत तक्रार लेखो स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या कार्यालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक ५/५/२०२६ रोजी माझे सही शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

**स्वाक्षरित**
**तालुका दंडाधिकारी, घनसावंगी**

दैनिक
# राज्य लोकतंत्र
गुरूवार दि.७ मे २०२६


# परळीत धक्कादायक घटना: उपचारात अक्षम्य हलगर्जीपणा !

## गर्भातील बाळाचा मृत्यू, तब्बल २२तास मृत भ्रुण ठेवले पोटात; मातेच्या जिवावर बेतले; डॉक्टरांविरोधात तक्रार

परळी वैजनाथ (प्रतिनिधी):

शहरातील एका खाजगी रुग्णालयातील डॉक्टरांच्या उपचारातील हलगर्जीपणामुळे गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. त्याचबरोबर या हृदयद्रावक घटनेनंतरही गांभीर्य न घेता केवळ अर्थिक लाभ उठविण्याच्या उद्देशाने या गरोदर मातेच्या पोटात तब्बल २२तास मृत भ्रुण ठेवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या डॉक्टरच्या हलगर्जीने बाळ तर दगावलेच पण त्यानंतर या बाळाच्या मातेची प्रचंड हेळसांड करुन तिच्याही जीवाशी खेळ केल्याचा अमानवी व वैद्यकीय क्षेत्राला डाग लावणारा गंभीर लज्जास्पद प्रकार या डॉक्टरांनी केला आहे. याप्रकरणी संबंधित डॉक्टरां विरोधात शहर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करण्यात आली असून कर्तव्यात कसूर, बाळाच्या मरणास कारणीभूत व मातेच्या जीवाशी




खेळण्याच्या अघोरी प्रकाराची सखोल चौकशी करून कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी मागणी करण्यात आली आहे.

या हृदय पिळवटून टाकणाऱ्या व धक्कादायक प्रकारानंतर वैजनाथ संभाजी मुंडे यांनी पोलीसांत धाव घेऊन गित्ते हॉस्पीटलच्या डॉ. कल्पना सचिन गित्ते यांच्याविरुद्ध कायदेशीर तक्रार दाखल केली आहे.तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या पत्नीवर गेल्या काही महिन्यांपासून संबंधित डॉक्टरांकडे उपचार सुरू होते. २३ एप्रिल रोजी अचानक पोटदुखीचा त्रास सुरू झाल्यानंतर त्यांनी डॉक्टरांशी संपर्क साधला. डॉक्टरांनी तातडीने दवाखान्यात येण्यास सांगितले. मात्र, रुग्णालयात दाखल केल्यानंतरही योग्य वेळी तपासणी व उपचार करण्यात आले नाहीत. तसेच, सोनोग्राफीसाठी बाहेरील केंद्रावर पाठविण्यात आले. तेथे झालेल्या तपासणीनंतर गर्भातील बाळाची स्थिती गंभीर असल्याचे सांगण्यात आले. तरीही रुग्णालयात वेळेत आवश्यक वैद्यकीय निर्णय न घेता विलंब करण्यात आला. दरम्यान, उपचाराच्या नावाखाली वारंवार पैसे मागण्यात आले.प्रचंड अर्थिक शोषण करण्यात आले. डॉक्टरांच्या अक्षम्य दुर्लक्ष व हलगर्जीमुळे गर्भातील बाळाचा मृत्यू तर झालाच परंतु गरोदर मातेच्या जीवाशीही खेळण्याचा प्रकार या डॉक्टरांनी केला. मृत बाळ पोटात असतांना ते काढण्यासाठीची प्रसुती प्रक्रिया करण्यासाठी तब्बल २२ तास लावले ही अतिशय गंभीर बाब असुन या मातेच्या जीवाशीच खेळण्याचा प्रकार केवळ अर्थिक फायदा उचलण्यासाठी करण्यात आलेला आहे. या घटनेमुळे तक्रारदार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या संपूर्ण प्रकरणात संबंधित डॉक्टरांनी निष्काळजीपणा करून रुग्णाच्या जीवाशी खेळ केल्याचा आरोप करत, दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे. तसेच, या प्रकरणाची वैद्यकीय व कायदेशीर चौकशी करून सत्य समोर आणण्याची मागणीही करण्यात आली आहे. पोलीस प्रशासनाने तक्रार प्राप्त झाल्याची पुष्टी केली असून पुढील तपास सुरू असल्याचे सांगितले आहे.

### जिल्हा शल्य चिकित्सकांकडेही न्यायाची मागणी

दरम्यान, या धक्कादायक व अमानवी कृत्याची चौकशी करावी व वैद्यकीय उपचाराच्या नावाखाली आर्थिक शोषण, मानसिक त्रास आणि नागरिकांच्या जीवाशी होणारा खेळ थांबवावा अशी मागणी करण्यात आली आहे. अतिशय गंभीर असा हा प्रकार पवित्र समजल्या जाणाऱ्या वैद्यकीय क्षेत्राला डाग लावणारा आहे.यापुर्वीही सोनपेठ तालुक्यातील एका महिलेच्या बाबतीतही याच डॉक्टरांनी असाच प्रकार केल्याचे समोर आले आहे.केवळ अर्थिक लाभ उठविण्यासाठी नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचा हा प्रकार वारंवार घडत असुन याबाबत वैजनाथ संभाजी मुंडे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांची भेट घेऊन तक्रार दाखल केली आहे.या प्रकरणी आता सखोल चौकशी करून संबंधितांवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# पत्नी नांदायला येत नसल्याने संतापलेल्या पित्याचा दोन चिमुरड्यांना जाळण्याचा प्रयत्न

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातून लाहमेवाडी गावात अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे.पत्नी नांदायला येत नसल्याच्या कारणावरून संतापलेल्या पतीने स्वतःच्या दोन लहान मुलींना जिवंत जाळण्याचा प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली आहे.ही घटना माजलगाव तालुक्यातील लहामेवाडी येथे घडली असून, वेळेवर हस्तक्षेप झाल्याने मोठा अनर्थ टळला.

या संदर्भात पोलीस सुत्रांकडून मिळालेली माहिती अशी की,फिर्यादी अश्विनी महेश सोमासे (वय ३३, रा.टालेवाडी) या पतीसोबत




झालेल्या कौटुंबिक वादामुळे सध्या माहेरी राहत होत्या. दि.२ मे रोजी सायंकाळी सुमारे ५:०० वाजता, त्यांचे पती महेश विष्णू सोमासे हे दुचाकीवरून दोन्ही मुलींना घेऊन लहामेवाडी येथे आले. त्यांनी पत्नीला नांदायला चल असे सांगितले. मात्र अश्विनी यांनी गावातील प्रतिष्ठित व्यक्तींसमोर बैठक घेऊन वाद मिटवण्याचा प्रस्ताव दिला. यामुळे संतापलेल्या आरोपीने संतापाच्या भरात गंभीर पाऊल उचलले.आरोपीने धमकी देत दुचाकीवरील पिशवीतून डिझेलचा कॅन काढून आपल्या ५ वर्षांच्या मृणाल आणि ४ वर्षांच्या मृण्मय या चिमुरड्यांच्या अंगावर डिझेल ओतले.त्यानंतर काडीपेटी काढून त्यांना पेटवण्याचा प्रयत्न केला.या प्रकारामुळे अश्विनी आणि त्यांच्या आईने आरडाओरडा केला.आवाज पान ३ वर

# पाटोदा नगर पंचायत सदस्य अपात्रता प्रकरणात निकालासाठी जिल्हाधिकाऱ्यांना ४ आठवड्यांची मुदत

### उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे आदेश

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्हाधिकाऱ्यांकडे गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पाटोदा नगर पंचायत सदस्य अपात्रता प्रकरणाचा निकाल पुढील चार आठवड्यांत जाहीर करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत. शिवभूषण लक्ष्मणराव जाधव आणि शेख मोबीन शेख हमीद यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने हे निर्देश दिले. ड. नरसिंह जाधव यांच्यामार्फत याचिकाकर्ते शिवभूषण लक्ष्मणराव जाधव, शेख मोबीन शेख हमीद यांनी बीड जिल्हाधिकाऱ्यांकडे (प्रतिवादी क्र. २) दाखल केलेल्या अपात्रता अर्ज क्रमांक १६७/२०२४ आणि अपात्रता अर्ज क्रमांक १६८/२०२४ वर तातडीने निकाल देण्याची मागणी याचिकेद्वारे केली होती. हा निकाल लवकरात लवकर, शक्यतो दोन आठवड्यांच्या आत लागावा अशी विनंती याचिकाकर्त्यांच्या वतीने करण्यात आली होती. या प्रकरणावर न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती अजित बी. कडेठाणकर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. सुनावणी दरम्यान सरकारी वकिलांनी सूचनांनुसार माहिती दिली की, सदर अर्जावरील निकाल पुढील चार आठवड्यांत घोषित केला जाईल. न्यायालयाने हे विधान हमीपत्र म्हणून स्वीकारले आणि जिल्हाधिकाऱ्यांना चार आठवड्यांच्या आत निकाल देण्याचे निर्देश देऊन ही रिट याचिका निकाली काढली. या प्रकरणात याचिकाकर्त्यांतर्फे ड. नरसिंह जाधव यांनी काम पाहिले, तर शासनाच्या वतीने एजीपी मिस नेहा बी. कांबळे यांनी बाजू मांडली. राजकीय दबाव ; उच्च न्यायालयाचे आदेश असतानाही प्रकरण दोन वर्षांपासून प्रलंबित पाटोदा नगर पंचायतचे दोन सदस्य (१. माजी जिल्हा परिषद पान ३ वर

# चना खरेदीस २९ मे पर्यंत मुदतवाढ, धनंजय मुंडेंची मागणी केंद्र सरकारने केली पूर्ण

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात चना (हरभरा) खरेदीस शासकीय खरेदी केंद्रावर १५ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, तसेच पोर्टलवर याबाबत नोंद करण्यात मुदतवाढ देण्यात यावी या माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या मागणीस थेट केंद्र सरकारने मान्यता दिली असून शासकीय हमीभाव चना खरेदी केंद्रांवर आता २९ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.



२९ एप्रिल पर्यंत नाफेड द्वारा संचालित शासकीय केंद्रांवर चना खरेदीस शासनाने दिलेली मुदत २४ एप्रिल रोजीच ऑनलाइन नोंदी बंद करून शासनाने थांबवली होती. याबाबत उत्पादक शेतकऱ्यांनी विनंती केल्यानंतर धनंजय मुंडे यांनी राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या सह केंद्र सरकारला लेखी पत्राद्वारे विनंती करुन शासकीय केंद्रांवर किमान १५ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, अशी विनंती केली होती.

केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी याबाबत आज अधिकृत घोषणा केली असून आता चना (हरभरा) उत्पादक शेतकऱ्यांना आपला चना २९ मे पर्यंत ऑनलाइन नोंदी करून शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर विक्री करता येणार आहे. याबाबत संबंधित शेतकऱ्यांनी आ. धनंजय मुंडे यांच्या सह केंद्र व राज्य सरकारचे आभार मानले आहेत.

# आष्टीचा जावई थेट मुंबईत 'फौजदार'; तरटे यांची दमदार झेप!

### नोकरी सांभाळत ; जिद्द, मेहनत आणि चिकाटीचा भन्नाट विजय

आष्टी । प्रतिनिधी

कष्ट, जिद्द आणि हार न मानणाऱ्या वृत्तीसमोर कोणतीही अडचण टिकत नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. नोकरी करत असतानाच स्पर्धा परीक्षेचा ध्यास घेत तुषार तरटे यांनी थेट मुंबई पोलिस दलात पोलिस उपनिरीक्षक (फौजदार) पदावर झेप घेतली आहे. या धडाकेबाज यशामुळे आष्टी तालुक्यात अभिमानाची लाट उसळली आहे.

"आष्टीचा जावई मुंबईचा फौजदार झाला, हा आमच्यासाठी सन्मानाचा क्षण आहे," असे स्पष्ट शब्दांत माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे यांनी गौरवोद्गार काढले.

नोकरी + अभ्यास = यशाचा फॉर्म्युला!

दिवसभर नोकरी आणि त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेची तयारीअशा दुहेरी जबाबदारीतून मार्ग काढत तरटे यांनी हे यश खेचून आणले. त्यांच्या या यशामागे प्रचंड मेहनत, सातत्य आणि स्पष्ट ध्येय दिसून येते. नागरी पान ३ वर

# नसरापूर येथील बालिका अत्याचार प्रकरणी आरोपीला मृत्यू दंडाची शिक्षा द्यावी –रत्नपारखी

माजलगाव । प्रतिनिधी

पुणे येथील नसरापूर येथे झालेली घटना अतिशय निंदनीय दुर्दैवी व माणुसकीला काळीमा फासणारी आहे त्यामुळे नसरापूर येथील बालिका अत्याचार प्रकरणातील आरोपीस मृत्युदंडाची शिक्षा द्यावी अशी मागणी भाजपा शहर मंडळ माजलगाव तालुका अध्यक्ष तथा परशुराम हिंदू सेवा संघाचे प्रदेश सरचिटणीस विनायक रत्नपारखी यांनी तहसीलरी निवेदन देत टीव्ही मीडियाशी बोलताना केली.

माजलगाव तहसील येथे



नसरापूर येथे झालेल्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी ब्राह्मण समाज व इतर समाज बांधव यांच्यातर्फे निवेदन देण्यात आले.६५ वर्षाच्या नराधम व्यक्तीने अत्याचार करून मुलीचा खून केला या निंदनीय घटनेचा तीव्र निषेध संपूर्ण महाराष्ट्रातून होत आहे, आरोपीला शिक्षा होण्यासाठी कायदा व नियम कठोर करून आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा पान ३ वर

# राष्ट्रीय महामार्गावरील भेगा मिटेनात अन् जिल्हा प्रशासनाची 'बडवण्याची' हौस काही फिटेना

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाला जागोजागी मोठ्या भेगा पडलेल्या असुन या भेगांमध्ये दुचाकी वाहने अडकुन झालेल्या अपघातांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असुन अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे तर अनेकांना अपंगत्व आले आहे. सामाजिक कार्यकर्त्यांकडून दर्जेदार दुरूस्तीसाठी वांरवार निवेदने,आंदोलनाद्वारे पाठपुरावा करूनही सार्वजनिक बांधकाम विभाग आणि एमएससीआरडी आणि जिल्हा प्रशासन याकडे गांभीर्याने पाहत नसतानाच बीड जिल्हा प्रशासन मात्र जिल्हा रस्ते सुरक्षा समितीच्या नावाखाली जिल्हाधिकारी कार्यालयात घेतलेल्या बैठकीत जिल्ह्यातील रस्ते अपघातातील मृत्युंच्या प्रमाणात ३३



टक्क्यांची लक्षणीय घट झाली असुन या प्रभावी कामगिरीमुळे महाराष्ट्र राज्यात बीड जिल्हा रस्ते सुरक्षेच्या बाबतीत दुसरा क्रमांक पटकावला असल्याची माहिती देत स्वतःची टीर बडवुन घेताना दिसत असल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबाणेशकर यांनी दिली आहे.

बीड जिल्ह्यातुन जाणारे खामगाव ते पंढरपूर, अहमदपूर ते अहिल्यानगर, पैठण ते पंढरपुर आदी राष्ट्रीय महामार्गांवर मोठमोठ्या भेगा पडलेल्या असुन भेगांमध्ये दुचाकीचे चाक अडकुन मागील ४ वर्षात अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी काटेरी बाभळी आल्याने वाहनधारकांना अडथळा येत आहे तर काही ठिकाणी दुभाजकाच्या आजुबाजुला मोठ्या प्रमाणात माती साचल्याने वाहने घसरून पडण्याच्या घटना घडलेल्या आहेत. सामाजिक कार्यकर्ते यांनी लेखी तक्रारी केल्यानंतर दर्जेदार सिमेंट ब्लॉक कट करून दुरुस्ती करण्याऐवजी डांबरीकरण करून रस्त्याच्य भेगा पान ३ वर

# नात डॉक्टर झाली, आज्जीच्या कष्टाचे चीज झाले कडा प्राथमिक आरोग्य केंद्रात रंगला भावुक प्रसंग

आष्टी । प्रतिनिधी

'दुर्दम्य आशावाद, असामान्य कर्तृत्व आणि अदम्य साहस असल्यावर कोणतीही गोष्ट अशक्य नसते.' या वाक्याची प्रचिती नुकतीच बीड जिल्ह्यात आली. स्वतःच्या नातीने डॉक्टर व्हावे, यासाठी जिवापाड मेहनत घेणाऱ्या एका आज्जीच्या जीवनाचे खऱ्या अर्थाने सोने झाले आहे.ज्या नातीला खेळवले,वाढवले आणि जिच्या शिक्षणासाठी रात्रंदिवस एक केले.

लातूर शहरात नातीच्या शिक्षणासाठी सलग चार वर्ष खोली करून त्या राहिल्या

अशा या आज्जीच्या कष्टाचे चीज झाले. त्याच नातीकडून वैद्यकीय उपचार घेण्याचा एक अत्यंत भावुक आणि सुखावह प्रसंग नुकताच कडा येथील शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्रात पाहायला मिळाला.आष्टी येथील ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांची कन्या डॉ.शिवानी हिने हा अभिमानास्पद टप्पा गाठला आहे.उत्तम बोडखे हे पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्त्व असून, त्यांच्या पत्नी सौ. बबीता या शिक्षिका आहेत.घरातील उत्तम संस्कार आणि गुरुजनांची शिकवण या शिदोरीवर डॉ. शिवानी हिने जिल्हा परिषद शाळेतून आपल्या शिक्षणाचा श्रीगणेशा केला. आष्टी येथील पंडित नेहरू माध्यमिक विद्यालयात ९ वी. पर्यंत शिक्षण घेतले. पुढील शिक्षणासाठी शिवानी आष्टीहून लातूरला गेली.येथे शाहू कॉलेजमध्ये

शिक्षण घेतले.या खडतर प्रवासात तिची आज्जी रंगुबाई तिच्यासोबत राहून प्रचंड परिश्रम घेतले.आपली नात मोठी डॉक्टर व्हावी, हे एकच स्वप्न आज्जीच्या डोळ्यात होते.या कष्टाला यश आले आणि शिवानी 'नीट' परीक्षेत उत्तम गुणांनी उत्तीर्ण होऊन 'एमबीबीएस' डॉक्टर झाली.

गेल्या काही महिन्यांपूर्वीच डॉ. शिवानी यांची कडा येथील शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. तसेच,प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांच्या घरात सून म्हणून त्या नुकत्याच विवाहबद्धही झाल्या आहेत. मंगळवारी कडा येथील रुग्णालयात एक अनोखे दृश्य पाहायला मिळाले. ज्या आज्जीने शिवानीला घडवण्यासाठी




# आष्टी बसस्थानकाचा बोजवारा; डुकरांचे साम्राज्य, प्रवाशांची दुर्दशा!

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुका प्रगतीच्या गप्पा मारतोय, पण बसस्थानकाची अवस्था पाहिली तर विकासाचे फुगे अक्षरशः फुटतात! शहराच्या मध्यभागी असलेले बसस्थानक आज घाण, दुर्गंधी आणि निष्काळजीपणाचा जिवंत नमुना बनले आहे. २०१८ मध्ये मोठ्या थाटामाटात नवीन इमारतीची घोषणा झाली, पण ८ वर्षांनंतरही काम अधांतरीही केवळ दिरंगाई नाही, तर जनतेच्या सहनशीलतेचा उघडपणे घेतलेला गैरफायदा आहे!


"बसस्थानक की डुकरांचा अड्डा?"

बसस्थानकात शिरताच प्रवाशांचे स्वागत होते ते नाक दाबूनच!

कचऱ्याचे ढीग, सर्वत्र पसरलेली घाण आणि अर्धवट इमारतीत डुकरांचा मुक्त संचारहीच खरी परिस्थिती!

पिण्याचे पाणी नाही स्वच्छतागृह वापरण्यायोग्य नाही महिलांसाठी तर परिस्थिती अधिकच भीषण महिला वर्गाची प्रचंड कुचंबना होते.

प्रवाशांना उघड्यावरच नैसर्गिक विधी करावी लागतेहे चित्र थेट प्रशासनाच्या अपयशावर बोट ठेवणारे आहे! प्रचंड धुळीमुळे प्रवाशांना अतोना त्रास श्वसनाचे रोग जडण्याची शक्यता" २०१८ मध्ये काम सुरूमाजी आमदार भीमराव धोंडे यांच्या काळात. नंतर ५ वर्षे सत्ताबाळासाहेब



### ८ वर्षे झाली अजून किती वाट पाहायची?

आजबे यांच्या हाती. आता धुरासुरेश धस यांच्याकडे.

पण प्रश्न एकच

जनतेला या राजकीय 'पासिंग द पार्सल'शी काय घेणंदेणं?

काम कुणी सुरू केलं यापेक्षा, पूर्ण कोण करणार हे महत्त्वाचं!

आणि तेच इथे कोणीच करत नाही, ही वस्तुस्थिती आहे!

"गती आली म्हणे पण शेवट कुठे?"

२०२४ नंतर कामाला थोडी हालचालपण ८ वर्षांचा कालावधी म्हणजे सरळसरळ अपयशाचा पुरावा!

जनतेचा संयम आता संपत चाललायआणि तो फुटला, तर जबाबदार कोण?

"आता नाही तर कधीच नाही!"

आमदार सुरेश धस यांची ओळख आक्रमक नेते म्हणून आहे. मग हा प्रश्न सोडवताना आक्रमकता कुठे हरवली? तातडीने निधी, निर्णय आणि काम पूर्ण करण्यासाठी डेडलाईन जाहीर करा ठेकेदार व अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करा बसस्थानक 'युद्धपातळीवर' पूर्ण करा

संतप्त आवाज:

"आष्टीचे बसस्थानक म्हणजे नर्कयातना! रोज प्रवास करताना अपमान सहन करावा लागतो. आता तरी प्रशासनाने जागं व्हावं!"

अंतिम सवाल:

आष्टी बसस्थानकाचा हा 'वनवास' संपवणार कोण?

की अजून काही वर्षे जनता डुकरांसोबतच प्रवास करणार? मागे झाले ते झाले आता आमदार सुरेश आण्णा धस यांनी बस स्थानक प्रश्न लक्ष घालून लवकरात लवकर काम पूर्ण करून प्रवाशांचे हाल थांबावे अशी मागणी सामान्य जनतेतून लोक करू लागले आहे त्याचबरोबर बस स्थानकाच्या परिसरात आसपास अवैध धंदे सुरू आहेत त्याला देखील आळा बसला पाहिजे अशी सामान्य जनतेची मागनी जोर धरतआहे. पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
गुरुवार दि.७ मे २०२६ । पान ७

# शैक्षणिक पंढरीत बोगस शाळांचा सुळसुळाट

## पुणे महापालिकेकडून १३ शाळांची यादी जाहीर, पालकांना सूचना, प्रवेश घेऊ नका

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्राची शैक्षणिक पंढरी असलेल्या पुणे शहरात शिक्षणाचा खेळखंडोबा झाल्याचं समोर आलं आहे, कारण एक-दोन नाही तर तब्बल १३ शाळा बोगस असल्याचं उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. पुणे महानगरपालिकेने स्वतः शहरातील १३ बोगस शाळांची यादी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे जाहीर झालेल्या या संपूर्ण शाळांची नावे एकदम फर्स्ट क्लास असून काही इंग्रजी तर काही मराठी माध्यमातल्या शाळा आहेत. त्यामुळे, यापुढे या तेरा शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश घेऊ नका, असे आवाहन




पुणे महानगरपालिकेनं केलं आहे. तर, विद्यार्थ्यांचा प्रवेश घेतल्यास विद्यार्थ्यांचे नुकसान होईल, असाही इशारा महापालिकेनं दिला आहे.

शिक्षणाचा माहेरघर असलेल्या पुण्यातच १३ बोगस शाळा असल्याची यादी पुणे महानगरपालिकेने आज जाहीर केली आहे. या तेरा शाळांमध्ये कोणीही प्रवेश घेऊ नये असा आवाहनही परिपत्रक काढून पुणे महानगरपालिकेने केले. या शाळांची नाव बघितली तर संपूर्ण इंग्रजी आणि लॅविश नावं दिसत आहेत. मात्र, या शाळा बोगस असल्याचं महापालिकेने स्पष्ट केलं आहे. त्यामुळे पुण्यात विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा मोठा प्रश्न उपस्थित होत आहे. या शाळांनी शिक्षणाचा खेळ खंडोबा मांडलाय का? असाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. तसेच, एकीकडे शैक्षणिक पंढरी म्हणून देशात नाव असलेल्या पुणे शहरात जगभरातील विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. मात्र, या पुणे शहरातील शिक्षणाचा पायाच ढिसाळ झाल्याचं या १३ बोगस शाळांच्या उघड होण्याचे दिसून आलं आहे.

### पुण्यातील बोगस १३ शाळांची यादी

१. न्यू मिलेनियम स्टार इंग्लिश मिडीयम स्कूल बिबवेवाडी पोलिस स्टेशन जवळ विमलविहार समोर, चितामणी नगर, २. महात्मा गांधी प्रशाला प्लॉट नं.५२, लेन नं.२इ संजय पार्क, येवलेवाडी, पुणे

३. टीएम तखवा इस्लामिक स्कूल अँड मदरसा, स.न. ७०/१/१, छखइच् रोड कोंढवा बु पुणे-४११०४८ ४. सेंट क्यूटू इंटरनॅशनल स्कूल कोंढवा बु पुणे ५. इमॅन्युअल पब्लिक स्कूल, महंमदवाडी रोड हडपसर पुणे-२८ ६. आनंदाशा अकॅडमी स्कूल अजिंक्य डी. वाय. पाटील रोड लोणीकालभोर पुणे

७. एलोरा मेडिकल अँड एज्युकेशन फाउंडेशन आयर्न पब्लिक स्कूल मानाजी नगर नरे, पुणे

८. लेजसी हाय स्कूल अशोक नगर कोंढवा बु पुणे

९. शिवाली नोमानी इंग्लिश मिडीयम स्कूल अशोक नगर कोंढवा बु पुण

१०. ऑलिव्ह व इंटरनॅशनल स्कूल, उंडी ता. हवेली पुणे

११. ग्लोबल एज्युकेशन ट्रस्ट पुणे इकरा इस्लामिक स्कूल, कोसरवाडी कोंढवा पुणे

१२. ग्लोबल इंग्लिश मिडीयम स्कूल, औंधवा बु पुणे

१३. आयर्न वर्ल्ड स्कूल, उंडी पुणे

# पुण्यात लाचखोरीचे प्रकार सुरुच

## दीड लाखांची लाच घेताना पोलिस कर्मचाऱ्याला अटक, आरोपीने तक्रारदाराचा घेतला चावा

पुणे । प्रतिनिधी

शहरात पोलिस दलातील लाचखोरीच्या घटनांनी पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. अवघ्या काही दिवसांत तीन पोलिस कर्मचारी लाचखोरीच्या प्रकरणात अडकले असून, यामुळे पोलिस यंत्रणेच्या प्रतिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ताज्या घटनेत कोरेगाव पार्क पोलिस ठाण्यातील गणेश कस्पटे या पोलिस कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. बोट क्लब परिसरात ही कारवाई करण्यात आली. कस्पटे हा तक्रारदाराकडून दीड लाख रुपयांची लाच स्वीकारताना पकडला गेला.

या कारवाईदरम्यान आरोपीने आक्रमक वर्तन करत तक्रारदारालाच चावा घेतल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. एवढेच नाही, तर -उइ च्या अधिकाऱ्यांनाही त्याने धक्काबुक्की केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे हे प्रकरण तापले आहे. गेल्या १ मेपासून बुधवारपर्यंत पोलिस दलातील दोन अधिकारी आणि एका कर्मचाऱ्याला लाचखोरीच्या आरोपात अटक करण्यात आली आहे. सलग घडणाऱ्या या घटनांमुळे पुण्यातील पोलिस दलात शिस्त आणि पारदर्शकतेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.या प्रकरणी पुढील चौकशी सुरू असून, आरोपीवर कठोर कारवाई केली जाईल, असे ACB कडून सांगण्यात आले आहे. नागरिकांकडूनही अशा प्रकरणांवर कठोर पावले उचलण्याची मागणी केली जात आहे.

# चार वर्षांच्या प्रेमानंतर लग्न; महिन्यातच संसार संपला

पुणे: चार वर्षांच्या प्रेमातून फुललेले नातेः घरच्यांचा विरोध झुगारून वयाने पाच वर्षे लहान असलेल्या तरुणासोबत लग्नाचा घेतलेला धाडसी निर्णयः सुखी संसाराची स्वप्ने डोळ्यांत साठवून उभा केलेला संसार. पण, वास्तव समोर येताच स्वप्नांचा चुराडा झाला. पतीची नाजूक आर्थिक परिस्थिती उघड होताच अवघ्या महिन्यातच संसार कोलमडला. माहेरी गेलेली पत्नी पुन्हा थेट न्यायालयातच उभी राहिली आणि समुपदेशनानंतरही दुरावा न मिटल्याने अखेर या प्रेमकथेचा शेवट घटस्फोटात झाला.

स्मिता (वय ३०) आणि राकेश (वय २५) (नावे बदललेली) यांची ओळख प्रेमात बदलली आणि चार वर्षांच्या नात्यानंतर त्यांनी आळंदीत कुटुंबीयांच्या इच्छेविरुद्ध विवाह केला. दोघांनीही नव्या आयुष्याची सुरुवात मोठ्या आशेने केली होती. परंतु, लग्नानंतर अवघ्या एका महिन्यातच पत्नीला पतीची आर्थिक परिस्थिती अपेक्षेपेक्षा वेगळी असल्याचे जाणवले. ही जाणीव नात्यात दरी निर्माण करणारी ठरली. ती माहेरी परतली आणि त्यानंतर पुन्हा सासरी न जाण्याचा निर्णय घेतला. पतीने अनेकदा समजावण्याचा प्रयत्न केला. परत येण्याची विनंतीही केली. मात्र, त्याला प्रतिसाद मिळाला नाही.

शेवटी, नात्यातील तणाव वाढत गेल्याने पतीने मार्च २०२५ मध्ये ड. शुभांगी टेमगिरे यांच्यामार्फत घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला. विशेष म्हणजे, या प्रक्रियेनंतर तब्बल एक वर्षाने पत्नी न्यायालयात हजर झाली आणि तिने पोटगीसाठी अर्ज केला.

न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान दोघांचेही वकील आणि समुपदेशकांनी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पतीची मर्यादित आर्थिक परिस्थिती आणि पत्नीचे पुढील आयुष्य या दोन्ही गोष्टींचा सखोल विचार झाला. अखेर, वादाच्या जागी संवादाने मार्ग काढला. पत्नीने लग्नावेळी झालेल्या खर्चापोटी ३० हजार रुपये आणि कपडे परत करण्याची मागणी केली. इतर कोणतीही आर्थिक देवघेव न करण्याचे दोघांनी मान्य केले आणि अखेर एकतर्फी वाटणारा हा वाद परस्पर संमतीच्या घटस्फोटात बदलला.

समुपदेशनाच्या प्रक्रियेत संवाद साधला गेला आणि दोघांनाही वास्तव परिस्थितीची जाणीव झाली. न्यायालयाचा उद्देश केवळ वाद सोडवणे नसून, दोन्ही पक्षांसाठी न्याय्य आणि व्यवहार्य तोडगा काढणे हा असतो. परस्पर संमतीने घेतलेला निर्णय हा भविष्यासाठी अधिक स्थिर आणि योग्य ठरतो.

ॲड. शुभांगी टेमगिरे

# पुण्यात भाजप नगरसेविकेमधला वाद चिघळला; अर्चना पाटलांसह पतीवरही ट्रॉसिटीअंतर्गत गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

शहरातील राजकीय वातावरण तापले असून भाजपच्या नवनिर्वाचित नगरसेविकांमधील वादावादी नव्याने समोर आली आहे. पुण्यात भाजप नगरसेविकांमधला वाद चांगलाच चिघळला असून भाजपच्या नगरसेविका अर्चना पाटील आणि त्यांचे पती तुषार पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलाय. येथील खडक पोलीस ट्रॉसिटी कायद्याअंतर्गत ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. भाजपच्याच नगरसेविका मृणाल कांबळे यांचे भाऊ बापू कांबळे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल




करण्यात आला.

पुणे महापालिका निवडणुकीपासून पाटील आणि कांबळे कुटुंबांमध्ये राजकीय वाद आणि मतभेद सुरू होते. निवडणूक प्रचारावेळी पाटील दांपत्याने जातीय द्वेषातून निवडणूक कार्यालयावरील बॅनर काढणे, कांबळे यांच्या कार्यकर्त्यांना दमदाटी करणे, तसेच विजयानंतर त्यांच्या घरासमोर लावलेल्या बॅनरवरुनही वाद निर्माण केल्याचा आरोप बापू कांबळ यांनी दिलेल्या फिर्यादीतून करण्यात आला आहे. तसेच पाटील हे जाणीवपूर्वक एका विशिष्ट समाजाला लक्ष्य करत असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला आहे. दरम्यान, याआधी भाजपच्या नगरसेविका अर्चना पाटील यांनी मृणाल कांबळे यांच्याविरोधात पोलीस आयुक्तांकडे तक्रार दाखल केली होती.

मुख्यमंत्र्यांना लिहिले होते पत्र

विशेष म्हणजे पुण्यातील भाजप नगरसेविकांचा हा वाद काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांच्या दरबारी पोहोचला होता, हा वाद केवळ स्थानिक पातळीवर मर्यादित न राहता थेट मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचल्यानंतही आता याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. नगरसेविका अर्चना पाटील यांनी थेट देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून या प्रकरणात हस्तक्षेप करण्याची विनंती केली होती. 'पक्षांतर्गत अनेकदा तक्रारी करुनही तोडगा निघाला नाही, त्यामुळे आता नाईलाजास्तव पोलिसांत धाव घ्यावी लागली,' अशी भूमिका पाटील यांनी घेतली होती. या तक्रारीमुळे भाजपच्या गोटात मोठी अस्वस्थता पसरली होती.

यापूर्वी वादाचा व्हिडिओ व्हायरल

दरम्यान, काही दिवसांपूर्वी पुण्यातील वसतिगृहाच्या कामावरून भाजपच्या (इगझ) आजी-माजी नगरसेविकांमध्येही तुफान खडाजंगी झाल्याचे पाहायला मिळाले होते. दोन गटातील वादाचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला होता. वसतिगृहाच्या कामाच्या टक्केवारीवरून दोन महिलांमध्ये आरोप-प्रत्यारोप केलेला वाद चव्हाट्यावर आला. बाणेरमधील माजी नगरसेविका राजश्री काळे आणि विद्यमान नगरसेविका रोहिणी चिमटे यांच्यात हा वाद रंगला होता. आता, नगरसेविका अर्चना पाटील आणि मृणाल कांबळे यांच्यातील वाद टोकाला गेला असून पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

# पुण्यात ३१ मेपर्यंत पाणीकपात नाही; उशिरा पावसाच्या पार्श्वभूमीवर नियोजन

पुणे: हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, यंदा पावसाळा उशिरा येण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील महापालिकांनी पाणी नियोजन काटेकोरपणे करावे, असे निर्देश मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आले आहेत. त्यानुसार मंगळवारी झालेल्या मान्सूनपूर्व नियोजन बैठकीत ३१ मेपर्यंत शहरातील पाणीकपात करू नये, असे आदेश महापौर मंजूषा नागपुरे यांनी प्रशासनाला दिले आहेत. त्यानंतर पावसाची परिस्थिती घेऊन निर्णय घेतला जाईल, असे सांगत पाणी जपून वापरण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांसह झालेल्या बैठकीला महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. महापौरांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत शहरातील विद्यमान पाणीसाठा, जलशुद्धीकरण व्यवस्था, वितरणप्रणाली आणि संभाव्य टंचाईला सामोरे जाण्यासाठीच्या उपाययोजनांचा सखोल आढावा घेण्यात आला.शहराला खडकवासला प्रकल्पांतर्गत पानशेत, वरसगाव, टेमघर आणि खडकवासला या धरणांमधून पाणीपुरवठा केला जातो. सध्या या धरणांतील साठा समाधानकारक असला तरी, भारतीय हवामान विभागाने कमी पावसाचा अंदाज वर्तविल्यामुळे प्रशासन सतर्क झाले आहे. सध्या धरणांमध्ये ३२.८० टक्के म्हणजेच १०.१३ टीएमसी साठा उपलब्ध आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही स्थिती समाधानकारक असल्याने तूर्तास कपातीची गरज नसल्याचे महापौरांनी स्पष्ट केले.

३१ ऑगस्टपर्यंतचे सूक्ष्म नियोजन

हवामान विभागाने यंदा ९२ टक्के पावसाचा अंदाज वर्तविला आहे, मात्र पाऊस जुलै महिन्यानंतरच अधिक सक्रिय होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन ३१ ऑगस्टपर्यंत शहराला पाणी पुरेल असे नियोजन महापालिका करीत आहे. ३१ मे रोजी पुन्हा एकदा हवामान विभागाचा अंदाज आणि धरणातील साठ्याचा आढावा घेऊन पुढील निर्णय घेतला जाईल, असे महापौर नागपुरे यांनी सांगितले.

'नो रनिंग टॅप्स' आणि वॉटर मीटर

पाणीकपात टाळण्यासाठी महापौरांनी पुणेकरांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः घरगुती कामांसाठी नळ चालू ठेवून पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी 'नो रनिंग टॅप्स' हे धोरण राबविण्याचे त्यांनी सुचविले आहे. तसेच, शहरातील पाणीगळती आणि वापराचा अचूक अंदाज घेण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर 'वॉटर मीटर रीडिंग' सुरू करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत. याचे कोणतेही बिल आकारले जाणार नाही. मात्र, पाण्याचा अपव्यय कुठे होतोय, हे यातून स्पष्ट होईल.

# राज ठाकरेंवर गुन्हा दाखल करा; ॲड. असीम सरोदे यांची मागणी

पुणे । प्रतिनिधी

जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे घडलेल्या साडेतीन वर्षीय मुलीवरील अत्याचार प्रकरणातील ६५ वर्षीय नराधमाला सरकारने कायदा काय सांगतो किंवा अजून कोण काय म्हणेल याचा विचार न करता हालहाल करत संपवावं, अशी भूमिका मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडिया पोस्टमधून मांडली आहे.

या भूमिकेला विरोध करत ठाकरे यांची मागणी बेकादेशीर



असून आरोपीला कायद्यानुसारच कठोर शिक्षा व्हावी, अशी भूमिका मांडत वकील असीम सरोदे यांनी बेकादेशीर मागण्या करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी पोलिसांकडे केली आहे.

ॲड. सरोदे म्हणाले की, भोर अत्याचार प्रकरणातील नराधमाला कायद्यानुसार १०० टक्के फाशीची शिक्षा होईल. पण ती होण्याआधी त्याचा चौरंग करा, त्याला हालहाल करून संपवा, अशा बेकायदेशीर मागण्या करणाऱ्या प्रवीण तरडे आणि राज ठाकरे यांच्यासारख्या लोकांना पोलिसांनी बोलावून घेऊन समज दिली पाहिजे किंवा अशा लोकांवर गुन्हा दाखल केला पाहिजे. कायदा हा एखाद्या घटनेसाठी बनवला गेलेला नसतो तर तो चिरंतन असतो. एखादी घटना घडल्यानंतर तेवढ्या घटनेपुरता कायदा बाजूला ठेवून वागावं आणि नंतर पुन्हा लोकशाहीने वागावं, असं सोयीनुसार करता येत नाही, असं स्पष्ट मत सरोदे यांनी मांडलं आहे.

# पुण्यात मालमत्ता कर घोटाळा; २३ गावांत कागदावर उभ्या इमारतींचा धक्कादायक प्रकार

पुणे: महापालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांमध्ये भ्रष्टाचाराचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे, ज्यामुळे महापालिका प्रशासनही हादरले आहे. प्रत्यक्षात एकही वीट रचलेली नसताना केवळ मोकळ्या भूखंडांवर कागदावर चक्क ५-५ मजली इमारती उभ्या करून त्यांचे प्रॉपर्टी टॅक्स रजिस्ट्रेशन (मालमत्ता करनोंदणी) आकरण्यात आली आहे. अधिकारी आणि स्थानिक पुढाऱ्यांच्या या 'कागदी खेळा'मुळे महापालिकेच्या तिजोरीवर दरोडा टाकण्याचा प्रयत्न झाला असून, आता या सर्व मालमत्तांची सखोल चौकशी करण्याचा निर्णय मिळकत कर विभागाने घेतला आहे.



शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शहरप्रमुख वसंत मोरे यांनी पत्रकार परिषदेत हा घोटाळा उघड केला. गुजर निंबाळकरवाडी गावातील प्रकरणे त्यांनी उघड केली असून, समाविष्ट गावांतील ३३ हजार मालमत्ता संशयाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. याप्रकरणी तत्काळ गुन्हे दाखल करण्याची मागणी मोरे यांनी केली आहे.

२०२१ मध्ये महापालिकेत २३ गावांचा समावेश करण्यात आला. नियमानुसार, या गावातील मालमत्तांची नोंदणी ग्रामपंचायतीच्या दफ्तरी असलेल्या 'नमुना नंबर ८' च्या आधारे महापालिकेत केली जाते. मात्र, गाव महापालिकेत येण्यापूर्वीच काही भ्रष्ट सरपंच, ग्रामसेवक आणि स्थानिक नेत्यांनी हातमिळवणी केली. मोकळ्या जमिनीवर प्रत्यक्षात काहीच नसताना कागदावर मात्र बहुमजली इमारती असल्याचे दाखविले. धक्कादायक म्हणजे, महापालिकेच्या कर विभागाच्या अधिकाऱ्यांनी 'जागी जाऊन पाहणी' करणे बंधनकारक असताना, केबिनमध्ये बसूनच या बनावट इमारतींवर कराचा शिक्का मारला. वसंत मोरे यांनी यासंदर्भात कर विभागाकडे पुराव्यासह तक्रार दाखल केली आहे. ग्रामपंचायतीच्या रेकॉर्डमध्ये मोठ्या प्रमाणावर फेरफार करून मोकळ्या प्लॉटवर इमारतींची नोंद केल्याची कागदपत्रे त्यांनी प्रशासनाला सोपवली आहेत. 'प्रशासनाच्या आशीर्वादानेच हा काळाबाजार सुरू असून, यामुळे भविष्यात महापालिकेचे कोट्यवधींचे नुकसान होणार आहे,' असा दावा मोरेंनी केला आहे.

जादा कर टाळण्यासाठी 'शॉर्टकट'

हा घोटाळा करण्यामागे मोठे आर्थिक हितसंबंध दडलेले आहेत. महापालिकेत नवीन बांधकामांना प्रचंड घरपट्टी भरावी लागते. मात्र, जर आधीच जुने बांधकाम असल्याचे दाखवले, तर भविष्यात त्याच जमिनीवर प्रत्यक्ष इमारत बांधताना कमी कर भरावा लागेल. हा 'शॉर्टकट' वापरण्यासाठी स्थानिक नेत्यांनी मालमत्ताधारकांकडून मोठे कमिशन घेऊन हा बनाव रचल्याचा आरोप होत आहे.


आयुक्तांनी दिले चौकशीचे आदेश

हे प्रकरण उघडकीस आल्यावर कर विभाग प्रमुख रवी पवार यांना या प्रकरणाची तातडीने चौकशी करण्याचे आदेश आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले आहे. त्यानुसार येत्या दोन दिवसांत समाविष्ट गावांतील मालमत्तांच्या पुनर्तपासणीचे आदेश दिले जातील, असे मिळकत कर विभाग प्रमुख रवी पवार यांनी स्पष्ट केले.

# आयांनो सावध रहा, काळ बदललाय; पर्वती पायथा परिसरात घडलेल्या घटनेनंतर चित्रा वाघ यांचे आवाहन

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात नसरापूरनंतर आणखी एका ९ वर्षीय मुलीवर अत्याचार झाल्याची घटना घडली आहे.



पुण्यातील पर्वती परिसरात एका ५० वर्षीय व्यक्तीने अल्पवयीन मुलीवर अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. या संतापजनक घटनेनंतर संतप्त नागरिकांनी पर्वती पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन केले.

पुण्यातील पर्वतीच्या पायथ्याला ९ वर्षीय मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय. ५० वर्षांच्या व्यक्तीने चिमुकलीचे कपडे काढून लैंगिक शोषणाचा प्रयत्न केला. हा प्रकार नागरिकांनी पाहिल्याने अनर्थ टळला. नागरिकांमुळे पीडितेची नरधमाच्या तावडीतून सूटका झाली. यानंतर घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले.

घरातही लेकरं सुरक्षित नाहीत का?

याप्रकरणावर भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी देखील संताप व्यक्त केला आहे. पुण्यात सख्ख्या नातीवर आजोबांनी केलेल्या अत्याचाराने मन सुन्न झालं. घरातही लेकरं सुरक्षित नाहीत का? हा प्रश्न अस्वस्थ करतोय. नराधमाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

या असल्या लिंग पिसाटांपासून आपल्या लेकरांना वाचवायचं कसं? हा प्रश्न आई-बापांना पडलाय. मुख्यमंत्र्यानी पॅरोल न देण्याबाबत दिलेल्या सूचनांनी थोडा दिलासा मिळतोय. पण, आयांनो सावध रहा. काळ बदललाय. आपल्या लेकरांवर लक्ष ठेवा, अशी प्रतिक्रिया भाजप महिला प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांनी दिली आहे.